नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर –४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २९० * * अमरावती * बुधवार, दिनांक १६ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रुग्णालयातून मूल चोरीला गेल्यास परवाना रद्द

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :**
नवजात बाळांच्या तस्करीच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तर प्रदेश सरकारला फटकारले आणि राज्यांसाठी काही महत्त्वाचे नियम जारी केले. जर कोणत्याही रुग्णालयातून नवजात बाळाची तस्करी होत असेल तर त्याचा परवाना तात्काळ रद्द करावा, असे न्यायालयाने म्हटले आहे. प्रसूतीनंतर जर बाळ बेपत्ता झाले तर रुग्णालय जबाबदार असेल.

न्यायमूर्ती जेबी पारदीवाला आणि आर महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, देशभरातील सर्व उच्च न्यायालयांनी त्यांच्या राज्यांमध्ये बाल तस्करीशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचे स्थिती अहवाल मागवावेत. सहा महिन्यांत सर्व सुनावणी पूर्ण करा.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## सैतानांचा शांती संदेश

नक्षलवाद्यांचा पूर्णतः बिमोड होण्याची वेळ आलेली आहे. कारण 1976 सालापासून पश्चिम बंगालच्या नक्षलवादी गावांमधून सुरू झालेली ही नक्षलवादी ठिणगी आता हळूहळू विझत असल्याचे दिसते आहे. आपल्या देशाच्या जवळपास 120 जिल्ह्यांमध्ये आपल्या क्रूरतेची परमावधी गाठलेल्या या नक्षलवादी मंडळींनी अत्यंत क्रूरपणे कितीतरी बडे नेते, स्थानिक नेते, पोलीस अधिकारी, सामान्य पोलीस तसेच पॅरामिलिटरी फोर्स मधील जवानांची हत्या केली. त्यांनी केलेल्या हत्याकांडाची कोणतीही गणतीच नाही. गेल्या काही वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवाद्यांना संपवण्याचे कार्य गृहमंत्री अमित शहा यांना सोपवले. त्यांनी गेल्या पाच वर्षात नक्षलवाद्यांचे थोबाड असे काही फोडले आहे की, त्यांना म्हणजेच नक्षलवाद्यांना आपले तोंड दाखवायलाही जागा सोडलेली नाही. आता देशातील फक्त सहा जिल्ह्यांमध्ये नक्षलवादी उरलेले आहेत. त्यात आपल्या महाराष्ट्रातील एकमेव गडचिरोली हा जिल्हा आहे. या नक्षलवाद्यांचा मोठा म्होरक्या तेलगू भाषिक आहे. याने तेलगूमध्ये सरकारकडे 'शांतीवार्ता' करण्यासाठी अर्ज केला आहे. आता सरकारला या क्रूरकर्म्यांच्या बरोबर वार्ता करण्याची गरजच कुठे उरली आहे. गेल्या दोन–तीन वर्षात 400 पेक्षा अधिक अत्यंत क्रूरकर्मा आणि नामचीन असलेले नक्षलवादी ठार झालेले आहेत. कितीतरी नामचीन आणि फक्त नावाने भयकंप उडवणा?या अनेक नक्षलवाद्यांवर लाखोंचे बक्षीस आहे, अशा अनेक नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलेले आहे. आता पोलिसांची दहशतच इतकी मोठी आहे आणि त्यांच्याकडे इतकी जबरदस्त व्यवस्था आहे की, हे नक्षलवादी जिथे कुठे लपून असतील. तिथे डायरेक्ट ?क्शन पोलीस दलाच्या तुकड्या घेत असतात. जिथे जिथे त्यांचे अड्डे होते. त्याठिकाणी या मंडळींनी कोणतेही काम होऊ दिले नव्हते. तयार झालेले रस्ते आणि महामार्ग खोदून खोदून नष्ट करण्यात आले. त्यांच्या धाकामुळे नक्षल प्रभावित भागात एकही उद्योग उभारू शकला नाही. आता हे नक्षलवादी अगदीच दिगंबर झाल्यामुळे त्यांना शांतीचे महत्त्व कळलेले असावे. ज्या गडचिरोली जिल्ह्यात बदली होणे म्हणजे शिक्षा होती. त्या जिल्ह्यात सुरजागड सारखा महाप्रचंड प्रकल्प सुरू होत आहे. देशाच्या विकासासाठी या नक्षलवाद्यांना ठेचणे आवश्यकच होते. हे नक्षलवादी जनतेच्या भल्यासाठी काहीच करत नव्हते असे दिसून आलेले आहे. लाखो करोडोंच्या खंडण्या घेणे आणि सामान्य जनतेला धाकात ठेवणे हेच यांचे काम होते. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी आता उरलेल्या नक्षलवाद्यांना शरण येण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळेच सैतानी कारवाया करणाऱ्या नक्षलवाद्यांनी सरकारकडे शांती संदेश पाठवलेला आहे. हीच सरकारच्या शांतीवार्तेची फलश्रुती आहे. त्याबद्दल सरकारचे धन्यवाद!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आता नगराध्यक्षांची कसोटी...

# बहुमताने हटवता येणार!

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : नगर परिषद, नगरपंचायती, औद्योगिक नगरी कायद्यात सुधारणा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने मंगळवारी नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या एका महत्त्वपूर्ण तरतुदीस मान्यता दिली. सरकार यासंबंधी १९६५ च्या कायद्यात सुधारणा करणार आहे. या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात मोठे फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्य मंत्रिमंडळाची मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात बैठक झाली. या बैठकीत काल मुंबईतील चैत्यभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भाषण न करू दिल्याच्या मुद्यावर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. पण त्यात हा मुद्दा



चर्चेला आला नाही.

त्यानंतर मंत्रिमंडळाने नगराध्यक्षांना बहुमताच्या जोरावर हटवण्याच्या निर्णयासह जनहिताशी संबंधित विविध ७ निर्णयांवर आपली मोहोर उमटवली. यात कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास मंजूरी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय देखील आहे.

### मंत्रिमंडळाचे संक्षिप्त निर्णय

- चिखलोली-अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करणार व पदे मंजूर.
- कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास मंजूरी.
- नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या हस्तांतरणांसाठीच्या नियमांमध्ये बदलास मान्यता.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा. नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्ता करावरील दंड अंशतः माफ करून कर वसूलीसाठी व्हावी यासाठी अभय योजना
- नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदींस मान्यता,
- भूमिसंपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम मध्ये भूसंपादनाचा मोबदला विलंबाने अदा करताना आकारण्यात येणाऱ्या व्याजदरांच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय
- लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय

## लोकजनशक्ती पार्टीने सोडली एनडीएची साथ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :**
राष्ट्रीय लोक जनशक्ती पार्टी (रालोजपा) चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री पशुपती कुमार पारस यांनी मोठी घोषणा केली आहे. पशुपती कुमार पारस यांनी आम्ही एनडीएमधून बाहेर पडत असल्याचे म्हटले आहे.

आता आमचा आणि एनडीएचा काहीही संबंध नाही,असं म्हणत त्यांनी नितिशकुमार सरकारवर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. नितिशकुमार सरकार हे दलित विरोधी असल्याचं म्हटलं आहे. ते रालोजपाच्या एका कार्यक्रमात बोलत होते.

आजपासून आम्ही एनडीएसोबत असणार नाहीत. २०१४ पासून आम्ही एनडीएचे विश्वासू मित्रपक्ष होतो. पण आता आम्हाला ही गोष्ट देखील लक्षात घ्यावी लागेल की, जेव्हा लोकसभा निवडणूक होते तेव्हा, आमचा दलित पक्ष असल्यानं आमच्यावर प्रत्येकवेळी अन्याय होतो. जर महाआघाडीने आम्हाला योग्य सन्मान दिला तर भविष्यातील राजकारणाबाबत विचार करू असंही ते यावेळी म्हणाले.

स्वर्गीय रामविलास पासवान यांना भारतरत्न देण्यात यावे अशी मागणी पशुपती कुमार पारस यांनी केली आहे. आमचा पक्ष लवकरच राज्यातील २४३ मतदारसंघात सदस्य नोंदणी अभियान सुरू करणार असल्याची घोषणा देखील त्यांनी यावेळी केली आहे. यावेळी बोलताना त्यांनी केंद्र सरकार आणि बिहारमधील नितिशकुमार सरकारवर देखील जोरदार हल्लाबोल केला.

## कॅफे मालकाची हत्या

### जुन्या वादातून लांजेवार गँगने घातल्या सहा गोळ्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
नागपुरातील रामनगर चौकात स्थित सोशा कॅफेचे मालक अविनाश राजू भुसारी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. सोमवारी मध्यरात्री घडलेल्या या घटनेत कुख्यात गुंड लांजेवार आणि त्याच्या टोळीचा सहभाग आहे.

घटनेच्या रात्री अविनाश भुसारी हे निंबस कॅफेसमोर आईस गोला खात होते. त्यावेळी मोटरसायकल आणि मोपेडवर आलेल्या चार अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. गंभीर जखमी अविनाश यांचा व्होकार्ड हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पोलिसांच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, लांजेवार हा गेल्या काही दिवसांपासून सोशा कॅफेत येत होता. तो कॅफेचे बिल देत नसे आणि अविनाशला नेहमी धमकी देत असे. सोमवारी रात्री ११ वाजता लांजेवारने कॅफेत येऊन गोंधळ घातला. त्यानंतर अविनाशशी वाद घालून तो निघून गेला. काही वेळातच परत येऊन लांजेवारने पिस्तुलातून सहा गोळ्या झाडल्या. त्यापैकी तीन गोळ्या अविनाशला लागल्या. संपूर्ण घटना कॅफेतील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या फुटेजच्या आधारे पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

अंबाझरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विवेक राऊत यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे. मृतक अविनाश यांच्या वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी नागपूरच्याच मानकापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गोधनी परिसरातील प्रकाशनगरमध्ये भर बाजारात गोळीबार झाल्याची घटना घडली होती. नागपूर शहरात गुन्हेगारीने कळस घातला असून, खूनाच्या घटना वाढल्या आहेत.

## महिलांना ५०० रुपये ही अफवा : राज्यमंत्री

■ **नागपूर, दि. १५ :**
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र ८ लाख महिलांना ५०० रुपयेच मिळणार असल्याची सध्या चर्चा सुरू आहे. मात्र लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना ५०० रुपये मिळणार ही अफवा असल्याचे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी म्हटले आहे.

तसेच २१०० रुपये कधीपर्यंत मिळणार? याबाबतही त्यांनी त्यांनी माहिती दिली. ज्या दिवशी महसूल वाढ होईल, तेव्हा सर्व नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजनातील पात्र लाभार्थ्यांना सरकार टप्प्याटप्प्याने दिलेल्या वचनांची पूर्तता करेल, असे जयस्वाल यांनी स्पष्ट केले.

## आणखी एका कामगाराचा मृत्यू

### एमएमपी कंपनीतील स्फोट : मृत्यूसंख्या ६ वर

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**



उमरेड एमआयडीसीतील एमएमपी या अॅल्युमिनीयम पावडर बनविणाऱ्या कंपनीत झालेल्या स्फोटातील मृत्यूसंख्या आता ६ वर पोहचली आहे. स्फोटात गंभीर जखमी झालेल्या करण तुकाराम शेंडे (२०), रा. गोंडबोरी या कामगाराचा आज मंगळवारी येथील खाजगी रूग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

अॅल्युमिनीयम पावडर आणि फॉईल तयार करणाऱ्या उमरेडच्या एमएमपी कंपनीत ११ एप्रिल रोजी स्फोट होवून भीषण आग लागली होती. या घटनेत ५ कामगारांचा मृत्यू झाला होता तर १० ते १२ कामगार भाजले होते . स्फोटातील जखमींवर नागपूर येथे वेगवेगळ्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

या स्फोटप्रकरणी कंपनीच्या तिघांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून, मृतकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ६० लाख तर जखमींना प्रत्येकी ३० लाख रूपये देण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे . दरम्यान, आज मंगळवारी करण शेंडे याचा मृत्यू झाला. त्याचा मोठा भाऊ सुद्धा याच कंपनीत कामाला होता आणि स्फोटात त्याचाही यापूर्वी मृत्यू झाला होता.

## नॅशनल हेराल्ड प्रकरणी पहिले आरोपपत्र दाखल

### सोनिया, राहुल आणि पित्रोदा यांच्याविरुद्ध मनी लाँड्रिंगचे आरोप

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :**
काँग्रेसच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मंगळवारी पहिले आरोपपत्र दाखल केले. यामध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांची नावे आहेत.

या प्रकरणाची सुनावणी २५ एप्रिल रोजी दिल्लीतील राऊस अव्हेन्यू कोर्टात होईल. न्यायालयाने ईडीकडून या प्रकरणाची केस डायरीही मागितली आहे. या प्रकरणातील तक्रार भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सोनिया, राहुल आणि त्यांच्या सहयोगी कंपन्यांशी संबंधित लोकांविरुद्ध दाखल केली होती.

ईडीच्या आरोपपत्रावर काँग्रेस मीडिया सेलचे प्रमुख जयराम रमेश म्हणाले की, नॅशनल हेराल्डची मालमत्ता जप्त करणे हा कायद्याच्या नावाखाली राज्य पुरस्कृत गुन्हा आहे. हे पंतप्रधान मोदींच्या सूडाचे राजकारण आणि धमक्यांशिवाय दुसरे काही नाही.

या प्रकरणात, १२ एप्रिल रोजी तपासादरम्यान, जप्त केलेल्या मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. ईडीने ६६१ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी नोटीस बजावली होती.

## पाण्यासाठी भटकंती डोहात बुडून बालिकेचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १५ :**



उन्हाच्या झळा तीव्र होत असताना पाणीटंचाईचे चटके सुद्धा नागरिकांना बसत आहे. पाण्यासाठी भटकंती करताना पारधी बेड्यावरील एका लहान मुलीचा नदीत बुडून मृत्यू झाला. वेदिका सुरेश चव्हाण (१२), असे मृत मुलीचे नाव आहे.

आर्णी तालुक्यातील कठोडा येथील पारधी बेड्यावर रविवारी घडलेल्या या घटनेने शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील फोलपणा आणि प्रशासकीय अनास्थेचे भीषण वास्तव समोर आणले आहे. वेदिकाचा मृत्यू हा शासकीय यंत्रणेच्या हलगर्जीपणाचा बळी असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

शासन एकीकडे हर घर जल योजनेच्या माध्यमातून घराघरात पाणी पोहोचल्याचे दावे करत आहे. तर दुसरीकडे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या पारधी बेड्यावर अद्यापही मुलभूत सुविधा पोहोचल्या नसल्याचे या घटनेने स्पष्ट झाले.

कठोडा गावाजवळील या पारधी बेड्यावर सुमारे २०० नागरिक मूलभूत सुविधांच्या अभावात अनेक वर्षांपासून जगत आहेत. येथे एक हातपंप आहे. तोही उन्हाळ्यात कोरडा पडतो. पिण्याच्या पाण्यासाठी येथील महिला आणि मुलांना दररोज जीव धोक्यात घालून काही अंतरावरील अरुणावती नदीवरच अवलंबून राहावे लागते. सकाळी वेदिका गावातील महिलांसोबत याच नदीत पाणी भरण्याच्या प्रयत्नात नदीच्या डोहात बुडाली.

## वाघाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू

### तळोधी वनपरिक्षेत्रातील घटना

■ **महासागर प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. १५ :**
उन्हाळ्याला सुरुवात होताच वाघाच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली असून नागभीड तालुक्यातील तळोधी वनपरिक्षेत्रतील गंगासागर हेटी कक्ष क्रमांक ९९ मध्ये मारोती बोरकर (६५) यांच्यावर वाघाने हल्ला केला. त्यात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली.

या घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली. माहिती मिळताच वन पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. पंचनामा व इतर कारवाई सुरू आहे. दरम्यान मागील काही दिवसात वाघाच्या हल्ल्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात



मूल तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी ब्रम्हपुरी तालुक्यात एकाने वाघाच्या हल्ल्यात जीव गमावला.

तत्पूर्वी सिंदेवाही तालुक्यात देखील वाघाने एकाचा बळी घेतला होता. उन्हाळ्याच्या तीव्रतेत वाघ जंगलातून बाहेर गावात येत आहे. त्यामुळे मानव वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

## बीडमध्ये हत्यासत्र सुरूच भाजप पदाधिकाऱ्याचा खून

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. १५ :**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख



यांच्या हत्याकांडामुळे चर्चेत आलेल्या बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारी आणखी एक घटना घडली आहे.

बीडच्या माजलगाव येथे येथे भाजपच्या पदाधिकाऱ्याची भरदुपारी धारदार कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली.

बाबासाहेब आगे असे हत्या झालेल्या भाजप पदाधिकाऱ्याचे नाव आहे. माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव ग्राम पंचायतीचे सदस्य होते. ते भाजपचे विस्तारक म्हणून काम करत होते. मंगळवारी दुपारी २ च्या सुमारास ते भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांच्या भेटीसाठी माजलगाव शहरातील स्वामी समर्थ मंदिराजवळील भाजप कार्यालयात आले होते. त्यावेळी भाजप कार्यालयापुढेच कोयत्याने वार करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. हत्येनंतर बराच वेळ त्यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात घटनास्थळी पडून होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

आबासाहेब आगे यांच्या हत्येनंतर आरोपी नारायण शंकर फपाळ याने पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. तो हत्येनंतर चालत माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गेला. तिथे त्याने पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले.

## महागाईत दिलासा?

### खाण्यापिण्याच्या वस्तू स्वस्त : घाऊक महागाई २.०५%वर



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :**
मार्च महिन्यात घाऊक महागाई दर २.०५% पर्यंत खाली आला आहे. ही गेल्या ४ महिन्यांतील सर्वात कमी पातळी आहे. फेब्रुवारीच्या सुरुवातीला महागाई दर २.३८% होता. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती घसरल्याने महागाई कमी झाली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आज १५ एप्रिल रोजी ही आकडेवारी जाहीर केली.

घाऊक महागाईत उत्पादित उत्पादनांचा वाटा ६३.७५% आहे, अन्नासारख्या प्राथमिक वस्तूंचा वाटा २२.६२% आहे आणि इंधन आणि वीजेचा वाटा १३.१५% आहे. म्हणजेच, उत्पादित उत्पादनांच्या महागाईतील वाढ आणि घसरण याचा महागाई दरावर सर्वात जास्त परिणाम होतो.

घाऊक महागाईत दीर्घकाळ वाढ झाल्याने बहुतेक उत्पादक क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम होतो. जर घाऊक किमती दीर्घकाळ जास्त राहिल्या तर उत्पादक त्याचा भार ग्राहकांवर टाकतात. सरकार फक्त करांच्या माध्यमातूनच हढक नियंत्रित करू शकते.

कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली होती, त्याप्रमाणे सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्क कमी केले होते. तथापि, सरकार केवळ एका मर्यादितच कर कपात कमी करू शकते.

## यावर्षी मान्सून जोरदार!

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**
यावेळी जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सून सामान्यपेक्षा चांगला असेल, असे भारतीय हवामानशास्त्र विभागाने मंगळवारी स्पष्ट केले. हवामान विभाग १०४ ते ११० टक्के पाऊस सामान्यपेक्षा चांगला मानतो. हा पिकांसाठी एक चांगला संकेत आहे.

आयएमडी प्रमुख मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, २०२५ मध्ये १०५% म्हणजेच ८७ सेमी पाऊस पडू शकतो. ४ महिन्यांच्या मान्सून हंगामासाठी दीर्घ कालावधीची सरासरी ८६८.६ मिमी म्हणजेच ८६.८६ सेमी आहे. म्हणजेच पावसाळ्यात एकूण एवढा पाऊस पडायला हवा.

आयएमडी प्रमुख मृत्युंजय महापात्रा म्हणाले की, यावर्षी अल निनोची परिस्थिती निर्माण होणार नाही. सध्या देशाच्या अनेक भागात तीव्र उष्णता आहे. एप्रिल आणि जूनमध्ये उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या वाढेल. यामुळे पॉवर ग्रिडवर दबाव वाढेल आणि पाण्याची कमतरता निर्माण होईल. देशातील ५२% कृषी क्षेत्र मान्सूनवर अवलंबून आहे.

पावसाळ्यामुळे पाण्याच्या स्त्रोतांची कमतरता भरून निघते. वीजनिर्मितीसाठीही पाणी आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, सामान्य मान्सून हा मोठा दिलासा आहे. हवामानशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, आता मान्सूनमध्ये पावसाळी दिवसांची संख्या कमी होत आहे आणि मुसळधार पाऊस वाढत आहे.



**यावर्षी अल निनो नाही**
अल निनो हा हवामानाचा नमुना आहे. यामध्ये समुद्राचे तापमान ३ ते ४ अंशांनी वाढते. त्याचा परिणाम १० वर्षांतून दोनदा होतो. त्याच्या प्रभावामुळे, जास्त पाऊस असलेल्या भागात कमी पाऊस पडतो आणि कमी पाऊस असलेल्या भागात जास्त पाऊस पडतो. अल निनोमुळे भारतात मान्सून अनेकदा कमकुवत असतो. ज्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. यावर्षी मात्र अल निनो नाही.

## छावा फिल्म म्हणून वाईट...



■ **मुंबई :** छावा चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तसेच अनेकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्याचसोबत हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. मात्र, टीकेपेक्षा कौतुकच अधिक झाले आहे. या चित्रपटात अनेक मराठी कलाकार होते, त्यात आस्ताद काळे यांनी देखील एक छोटी नकारात्मक भूमिका केली होती. मात्र आस्ताद काळे यांनी या चित्रपटावर टीका केली आहे.

अभिनेता आस्ताद काळे यांनी फेसबुकवर पोस्ट केल्या आहेत. त्यात तो लिहितो, मी आता खरे बोलणार आहे.. छावा वाईट फिल्म आहे. फिल्म म्हणून वाईट आहे. इतिहास म्हणून बघायला गेलात तरी प्रॉब्लेमॅटीक आहे. सर्वतोपरी वाईट आहे. हा कुठला इतिहास आहे? महाराणी सोयराबाई सरकारांनी छत्रपती संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाच्या मुलाला पत्र पाठवले होते? काय पुरावा आहेत याचे? तसेच सोयराबाई राणी सरकार या परपुरुषासामोर बसून पान लावतायत? आणि ते खातायत? हे कसे चालते? सोयराबाई राणी सरकारांचे अंत्यसंस्कार एका रॅनडम नदी काठी ? असे नाही व्हायचे हो! अशी पोस्ट आस्ताद काळे यांनी फेसबुकवर केली आहे. औरंगजेबचे वय आणि आजारपण बघता, तो या वेगाने चालू शकेल? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. या फेसबुक पोस्टवर अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.


## नाना पटोले यांचा सरकारवर हल्लाबोल



■ **मुंबई :** महाराष्ट्र काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपप्रणीत महायुती सरकारवर शेतकरी विरोधी धोरणे आणि लाडकी बहीण योजनेतील धोकाधडीचा आरोप करत जोरदार टीकास्त्र सोडले आहे. ते म्हणाले, ह्नमहायुती सरकार शेतकऱ्यांवर अन्याय करत आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी कमी किमतीत घेऊन टोळीला फायदा करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सरकारने ९ टक्के व्याजदराचा निर्णय घेतला, हे व्यापारी आणि उद्योगपतांचे सरकार आहे. इथला राजा व्यापारी, तिथली जनता भिकारी अशी महाराष्ट्राची अवस्था झाली आहे.

लाडकी बहीण योजनेवर टीका करताना पटोले म्हणाले, निवडणुकीत २,१०० रुपये देण्याचे आश्वासन देऊनही सरकार आता फक्त ५०० रुपये देत आहे. आठ लाख महिलांना योजनेतून वगळण्याचे पाप या सरकारने केले आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनेच्या नावावर मतं मागायची आणि दुसरीकडे महागाई वाढवून लूट करायची, हा महायुतीचा डाव आहे. विकासासाठीही यांच्याकडे पैसे नाहीत, आणि लाडक्या बहिणींचा श्राप या सरकारला लागल्याशिवाय राहणार नाही.

## कराडला चकमकीत मारून टाकण्याचा प्लॅन



**मुंबई :** शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडला बनावटीत चकमकीत ठार मारण्याचा कट रचला जात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी एका निलंबित पोलिस अधिकाऱ्याने केलेल्या दाव्याचा दाखला दिला आहे. सदर अधिकाऱ्याने केलेले विधान अत्यंत गंभीर असून, वाल्मीक कराडचे काम संपल्यानंतर त्याला मारून टाकण्याचा प्लॅन रचला जात असल्याचे दिसत आहे, असे ते म्हणालेत. यामागे कोण आहेत? हे समोर आले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी या प्रकरणी केली आहे.

संजय राऊत म्हणाले, निलंबित पोलिस अधिकारी आपल्याला एन्काऊंटर करण्याच्या सूचना होत्या असा दावा करत आहेत. म्हणजे महाराष्ट्र व देशात अलीकडच्या काळात जे फेक एन्काऊंटर होतात, त्याची पुष्टी करणारे हे विधान आहे. त्याची चौकशी होणे गरजेचे आहे. हे निलंबित अधिकारी आपण ही नोंद अमूक एका पोलिस स्टेशनच्या डायरीत केली आहे, असा दावा करत असतील तर ते अधिक गंभीर आहे. अशा प्रकारची नोंद पोलिस डायरीत झाली असेल तर त्यावर अगोदरच का कारवाई झाली नाही? वाल्मीक कराडचे काम संपल्यानंतर त्याला मारून टाकायचे असा प्लॅन या प्रकरणात दिसत आहे. यामागे कोण आहे? हे लोकांपुढे आले पाहिजे.

या राज्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कर्मचाऱ्यांचे पगार द्यायलाही पैसे नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनीही किती मोठ्या वल्गना कराव्यात, आव आणावा, पण हे राज्य चालवणे आता आर्थिकदृष्ट्या सोपे राहिले नाही. याचे कारण गेल्या साडेतीन वर्षांत या राज्याची आर्थिक शिस्त पूर्णपणे बिघडली आहे. सध्या हे राज्य आर्थिक बेशिस्तीच्या खाईत सापडले आहे. पूर्ण आर्थिक अराजक माजले आहे. अजित पवार हे बोलत नसले तरी, त्यांनाही या चिंतेने ग्रासले आहे, असे राऊत म्हणाले.

## एकनाथ खडसे, अनिल थत्ते यांना नोटीस

■ **मुंबई :** भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते एकनाथ खडसे तसेच ज्येष्ठ पत्रकार अनिल थत्ते यांना मानहानीची कायदेशीर नोटीस पाठवली आहे. खडसे यांनी महाजन यांच्यावर एका महिला आयएएस अधिकाऱ्याशी संबंध असल्याचा गंभीर आरोप केला होता, तर थत्ते यांनी एका व्हायरल व्हिडिओद्वारे यासंदभार्तील दावे प्रसारित केले होते. या आरोपांमुळे महाजन यांची प्रतिमा डागाळल्याचा दावा त्यांनी केला आहे.

दरम्यान, अनिल थत्ते यांनी नोटीशीवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, पत्रकार म्हणून त्यांनी फक्त माहिती प्रसारित केली. राजकीय विश्लेषकांच्या मते, खडसे आणि महाजन यांच्यातील जुने वैर या प्रकरणामुळे पुन्हा पेटले आहे. या नोटीशीमुळे जळगावच्या राजकारणात खळबळ उडाली असून, आगामी काळात याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

# एकरी १५ हजार रुपये देऊन रात्री कांदा काढणी




■ **महासागर प्रतिनिधी**
**नाशिक, दि. १५ :**
कसमादे परिसरात उन्हाळ कांदा काढणीसाठी मोठ्या प्रमाणात मजूर टंचाई भासत आहे. यावर मात करण्यासाठी शेतक ?यांनी शेतात विजेची सोय करत रात्री कांदा काढणी सुरू केली आहे. यामुळे बहुतांश ठिकाणी कांदा काढणीसाठी रात्रीचा दिवस असे चित्र दिसत आहे.

काही दिवसांपासून वाढलेले ऊन आणि पडलेला अवकाळी पाऊस यामुळे कांद्याचे पीक लवकर काढणीसाठी आले आहे. एकाचवेळी सगळीकडे उन्हाळ कांदा काढणीसाठी आल्याने मजूर टंचाई मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. शेतीच्या कामांसाठी सुरगाणा, कळवण तालुक्यातील मजूर कसमादे परिसरात कांदा काढण्यासाठी उपलब्ध असतात.

यामुळे या भागात कांदा काढणीचे आणि साठवण्याची कामे वेळेवर होतात. कांदा लागवड ही टप्प्याटप्प्याने केलेली असते. मात्र यावर्षी वातावरणातील बदलामुळे कांद्याची पात वेळेच्या अगोदर वाळली आहे. त्यामुळे कांदा काढण्याशिवाय दुसरा पर्याय शेतकऱ्यांकडे नाही. यामुळे मजुरांची मागणी आहे. परिणामी मजुरांचा रोजगारही वाढला आहे.

एकरी आठ ते दहा हजारांपर्यंत असलेली मजुरी बारा ते पंधरा हजारांच्या घरात पोहोचली आहे. यामुळे सगळ्या बाजूंनी शेतकरी संकटात सापडला आहे. यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी रात्रीही कांदा काढणी सुरू केली आहे. त्नमजूर टंचाईमुळे मजुरी दुपटीने वाढली.

वातावरणातील बदलामुळे सर्वच शेतकऱ्यांचे कांदे एकाच वेळी काढण्यासाठी आले आहेत. यात अवकाळी पावसामुळे शेतकरी घाबरला आहे. मजुरांची टंचाई बघता रात्री मजूर मिळाले तरी कांदा काढण्यासाठी जास्तीचे पैसे देऊन कांदा काढण्यासाठी शेतकरी प्रयत्न करत आहेत.

२२शासनाने सुरू केलेल्या घरकुल योजने हप्ता २२ फेब्रुवारी रोजी प्रत्येकी १५००० रुपये एकाचवेळी लाभार्थींच्या खात्यात वर्ग झाले आहेत व या लाभार्थ्यांनी ९० दिवसांच्या आत घरकुल बांधकाम करणे गरजेचे आहे. यामुळे मजूर लाभार्थींनी घरकुल बांधकाम सुरू करण्याला प्राधान्य दिले आहे. यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणात मजूर टंचाई आहे.

## भिडेवर कुत्र्याचा हल्ला



■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. १५ :**
शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी उर्फ मनोहर भिडे यांच्यावर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना सोमवारी रात्री सांगलीत घडली आहे. कुत्र्याने भिडे यांच्या डाव्या पायाचा चावा घेतल्याची माहिती या प्रकरणी समोर येत आहे.

संभाजी भिडे सोमवारी रात्री सांगली येथील आपल्या एका धारकऱ्याकडे जेवणासाठी गेले होते. जेवणाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते आपल्या सहकाऱ्यांसोबत घरी परत येत होते. तेव्हा शहरातील माळी गल्ली भागात एका कुत्र्याने अचानक त्यांच्यावर हल्ला चढवत त्यांच्या डाव्या पायाचा चावा घेतला.

उल्लेखनीय बाब म्हणजे संभाजी भिडे अनेकदा आपल्या वादग्रस्त विधानांमुळे अडचणीत सापडतात. त्यांनी नुकतेच रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीचे समर्थन करून संभाजीराजे छत्रपती यांच्या ही समाधी हटवण्याच्या विधानाचा विरोध केला होता.

संभाजी भिडे यांनी कथित ऐतिहासिक दाखला देत वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडावरून हटवण्यास विरोध केला होता. वाघ्या कुत्र्याची जी कथा सांगितली जाते ती खरीच आहे. वाघ्या कुत्र्याने शिवाजी महाराजांच्या चितेत उडी घेतली होती. त्यामुळे त्याचे स्मारक तिथे बांधण्यात आले. माणसे जेवढी एकनिष्ठ नसतात तेवढी कुत्री असतात, असे ते म्हणाले होते.

## ठाकरेंच्या शिवसेनेला सत्तेत यायचे, पण...

### चंद्रकांत पाटील यांचा दावा



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ :**
उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उबाठा) सत्तेत सहभागी होण्यास उत्सुक आहे, परंतु त्यांना कोणीही स्वीकारत नाही, असा गौप्यस्फोट भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला आहे.

या परिस्थितीमुळे संजय राऊत सातत्याने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करत असल्याचा दावाही पाटील यांनी केला. येत्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत ठाकरे गटाला उमेदवार मिळणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला.

पाटील म्हणाले, उद्धव ठाकरेंना सत्तेत यायचं आहे, पण त्यांना एकनाथ शिंदे, अजित पवार किंवा देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत येण्यासाठी कोणी संधी देत नाही. यामुळेच राऊत अमित शाह यांच्यावर हल्लाबोल करतात. अमित शाह यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील ५०० पानी पुस्तक लिहिल्याचा उल्लेख करत पाटील यांनी राऊत यांना त्याचा अभ्यास करण्याचा सल्लाही दिला.

दरम्यान, संजय राऊत यांनी पाटलांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना म्हटले, सत्तेसाठी आम्ही अमित शाह यांचे पाय चाटणार नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात शिवसेना स्वाभिमानाने लढेल. मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे गट स्वबळावर लढणार असल्याचेही राऊत यांनी स्पष्ट केले.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ठाकरे गट आणि महायुती यांच्यातील वाढता तणाव मुंबईच्या राजकारणात नवे वाद निर्माण करू शकतो.

# खैरे, दानवे वाद 'मातोश्री'वर

### मोठा निर्णय घेण्याचे संकेत



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यातील वाद सर्वश्रूत आहे. खैरे यांनी नुकतेच अंबादास दानवे लै काड्या करतो असे म्हणत त्यांच्यावर आपल्याला जिल्ह्यातील राजकारणात विश्वासात न घेण्याचा आरोप केला होता. तसेच हे प्रकरण उद्धव ठाकरे यांच्या कानावर घालण्याचा इशाराही दिला होता. त्यानुसार, खैरे आज मातोश्रीवर ठाकरेंची भेट घेण्यासाठी पोहोचलेत.

छत्रपती संभाजीनगर हा शिवसेनेचा बालेकिल्ला होता. पण शिवसेनेतील फुटीनंतर येथे उद्धव ठाकरे यांना प्रचंड धक्का बसला. चंद्रकांत खैरे व अंबादास दानवे हे दोन नेते सोडले तर शिवसेनेचे सर्वच स्थानिक नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले होते. दानवे व खैरे यांचे खरे तर एकमेकाशी थोडेही जमत नाही. पण त्यानंतरही त्यांनी ठाकरेंसोबतच राहणे पसंत केले होते. त्यांच्या या निर्णयाची ठाकरे गटातील वरिष्ठ पातळीवर दखल घेतली होती. पण त्यानंतरही या दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर कुरघोडी करण्याचे राजकारण संपले नाही.

चंद्रकांत खैरे यांनी नुकताच अंबादास दानवे यांच्यावर आपल्याला विश्वासात न घेण्याचा आरोप केला होता. शिवसेना मी वाढवली. अंबादास मागूण आला. पण तो लय काड्या करतो, त्यांची तक्रार मी मातोश्रीकडे करणार, असेही ते यावेळी म्हणाले होते. त्यानंतर तत्काळ ते मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी त्यांच्या मातोश्री या निवासस्थानी पोहोचले.

### महार रेजिमेंट मुख्यालयात डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी विशेष मोहीम

## पंतप्रधानांना एक लाख पोस्टकार्ड पाठवणार



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**
महार रेजिमेंटच्या मुख्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यात यावा या प्रमुख मागणी साठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे लक्ष वेधण्यासाठी रिपब्लिकन युवा मोर्चा व महार रेजिमेंटच्या निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या यशसिद्धी वेल्फेअर असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरामध्ये प्रधानमंत्री कार्यालयाला पोस्ट कार्ड पाठवण्याच्या अभियानाची सुरुवात करण्यात आली.

सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या या अभियानात दुपारी तीन वाजेपर्यंत सुमारे पंधरा हजार नागरिकांनी सहभाग दर्शवला. अंदाजे एक लाख पोस्टकार्ड पुणे शहरातून पाठवण्याचा मनोदय यावेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला.

यावेळी रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे व महार रेजिमेंटचे निवृत्त सैनिक कॅप्टन भगवान इंगोले, नायक सुरेश वानखडे, नायक धनराज गडबडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पोस्ट कार्ड पाठवण्याच्या मोहिमेमध्ये आंबेडकरी चळवतील ज्येष्ठ नेते वसंत साळवे, आरपीआय आठवले गटाचे प्रदेश संघटक परशुराम वाडेकर, अॅड. मोहन वाडेकर, भारत मुक्ती मोचार्चे सचिन बनसोडे, रिपब्लिकन जनशक्तीचे शैलेंद्र मोरे, दलित पॅंथर ऑफ इंडियाचे बापूसाहेब भोसले, रिपब्लिकन सेनेचे युवराज बनसोडे, रिपब्लिकन युवा मोर्चाच्या सुवर्णा डंबाळे, रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे विवेक बनसोडे, भिम सेवा प्रतिष्ठानचे राम डंबाळे, सिद्धांत सुर्वे, निखिल बहुले इत्यादी सहभागी झाले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रतीक डंबाळे, राहुल नागटिळक यांनी केले.

यावेळी महार रेजिमेंटच्या मुख्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा बसवण्यासाठी राज्यभरातून किमान दहा लाख पोस्ट कार्ड पाठवण्याचा मानस असून, ही मोहिम पुढे अनेक दिवस सुरू राहणार असल्याचे राहुल डंबाळे यांनी सांगितले.

## शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली मोठी फसवणूक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**
शेअर ट्रेडिंग मध्ये गुंतवणुक केल्यास चांगल्याप्रकारे परतावा अल्पावधीत मिळेल असे अमिष दाखवून पुण्यातील एका व्यवसायिकाचा विश्वास संपादन करुन सायबर चोरटयांनी ३६ लाख ९२ हजार रुपयांची आर्थिक फसवणुक करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे.

याप्रकरणी पार्था साहा यांनी व्हॉटसअप ग्रुपचे वापरकर्ते व धारक, अॅप व लिंकचे वापरकर्ते व धारक तसेच विविध बँक खातेधारक यांचे विरोधात खराडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार पार्था साहा यांना सायबर चोरटयांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून सुरुवातीला संपर्क केला. आस्क इन्वहेस्टमेंट मॅनेजरस लिमिटेड या शेअर ट्रेडिंग कंपनीचे ते एजंट असल्याचे एका व्यक्तीने त्यांना सांगितले. मोठया स्वरुपात गुंतवणुक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगत आरोपींनी तब्बल ३६ लाख ९२ हजार ६२७ रुपयांची गुंतवणुक करण्यास भाग पाडले. परंतु त्याबाबत कोणताही परतावा न देता सदर रकमेचा अपहार करुन फसवणुक करण्यात आली.

क्रिप्टो करन्सी बहाण्याने जयगोपाल झा नामक व्यक्तीची तीन लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची आणखी एक घटना उघडकीस आली असून पोलीस तपास करीत आहेत.

## ज्ञानकुल संस्थेचा 'ज्ञानोत्सव' संपन्न



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
शालेय अभ्यासक्रमासोबत विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, विविध कला आणि साहित्य यांचे शिक्षण देणाऱ्या ज्ञानकुल संस्थेचा तीन दिवसीय ज्ञानोत्सव चेंबूरमधील बाल विकास संघ येथे पार पडला.

'अखंड भारत' या संकल्पनेच्या अंतर्गत एकात्मता स्तोत्रावर आधारित या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले प्रकल्प मांडण्यात आले होते ज्याची माहितीही विद्यार्थी उत्साहाने देत होते. या प्रदर्शनातून अखंड भारतातील विविध उपखंडांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसाचे दर्शन घडवण्यात आले. भारताच्या इतिहासातील उल्लेखनीय घटनांचे चित्रणही या प्रदर्शनातून करण्यात आले होते.

भारतातील राजे-महाराजे, साधू-संत, क्रांतिकारक, वीरांगना, प्राचीन ग्रंथ साहित्य यांविषयीची सचित्र माहिती याठिकाणी मांडण्यात आली होती. पुरातन चलने, नाणी, शिवकालीन अस्त्र-शस्त्र प्रदर्शनात मांडण्यात आले होते. अखंड भारतातील प्रसिद्ध नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे, शक्तिपीठे, ऐतिहासिक कला आणि साहित्य यांवर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी तयार केले होते ज्याला तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली होती.

ऐतिहासिक ज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेली कोडी प्रदर्शन पाहणाऱ्यांचे कुतूहल वाढवत होती. यावेळी ज्ञानकुलच्या विद्यार्थ्यांनी लाठीकाठीची प्रात्यक्षिके, भजने आणि शौर्यगीते सादर केली. बिल्लाबोंग इंटरनॅशनल शाळेचे चेअरमन सुधीर गोयंका, आर्यन एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन आमोद उसापकर , चेंबूरचे सी. ए. तेगचंद गुप्ता आणि भारत विकास परिषदचे क्षितिज गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उदघाटन झाले.

दूरदर्शनवर गाजलेल्या 'महाभारत' मालिकेतील भीष्म पितामह यांची अजरामर भूमिका साकारणारे अभिनेते मुकेश खन्ना आणि इंडियन एक्सप्रेस आणि माय उडान ट्रस्टच्या संचालिका अनन्या गोयंका यांनी या प्रदर्शनाला आवर्जून उपस्थिती नोंदवली. अन्य शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक, इतिहासप्रेमी, संशोधन प्रेमी तसेच शेकडो नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

# महाराष्ट्राची कायदेशीर सहाय्यता कामगिरी निराशाजनक

### पोलिस यंत्रणेच्या कामगिरीत राज्य पाचव्या स्थानावर : इंडिया जस्टिस रिपोर्ट

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १५ :**
इंडिया जस्टिस रिपोर्टने प्रसिद्ध केलेल्या 2025 च्या अहवालानुसार, महाराष्ट्राला दहावे स्थान प्राप्त झाले आहे. 2022 मध्ये महाराष्ट्र बाराव्या स्थानवार होता. कायदेशीर सहाय्यतेच्या निकषावरील क्रमवारीत राज्याची घसरण झाली असून 14 व्या स्थानावर गेले आहे.

2022 साली 7 व्या स्थानावर होते. पोलिस यंत्रणेच्या कामगिरीबाबत मोठ्या व मध्यम आकाराच्या राज्यांमध्ये महाराष्ट्राला 5 वे स्थान प्राप्त झाले आहे, जे 2022 मध्ये 10 व्या स्थानी होते.

कर्नाटक राज्याने एकंदरीत क्रमवारीत प्रथम स्थान कायम ठेवले आहे. अंध्राप्रदेशने 2022 मधील पाचव्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. तेलंगणाने 2022 मधील तिसरे स्थान कायम राखले आहे. केरळ राज्य 2022 मधील सहाव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर आले आहे. तर छोट्या राज्यांमध्ये सिक्कीमने पहिले स्थान कायम राखले आहे, हिमाचल प्रदेश आणि अरुणाचल प्रदेशचा क्रमांक लागला आहे.

दरम्यान, मोठ्या व मध्यम आकाराची राज्ये म्हणजे 1 कोटीहून अधिक लोकसंख्या असलेली राज्ये. तर छोटी राज्ये म्हणजे 1 कोटींहून कमी लोकसंख्या असलेले राज्य. इंडिया जस्टिस रिपोर्ट अहवाल टाटा ट्रस्टने सर्वप्रथम सुरू केला होता. आयजेआरचा अहवाल 2019 साली सर्वप्रथम प्रसिद्ध करण्यात आली होती. सेंटर फॉर सोशल जस्टिस, कॉमन कॉज, कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव, दक्ष, टिस-प्रयास, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी आणि हाउ इंडिया लिव्ह्ज यांसह अन्य काही सहयोगींच्या सहयोगाने हे सर्वेक्षण केले जाते.

हा अहवाल 24 महिन्यांच्या संख्यात्मक संशोधनाच्या आधारे तयार करण्यात आलेल्या 2025 च्या या अहवालात अपेक्षित सेवा प्रभाविरीत्या देण्याच्या दृष्टीने न्यायदान रचनांच्या सक्षमतेच्या निकषावर राज्यांच्या कामगिरीचे मापन केले आहे.

अधिकारप्राप्त सरकारी स्त्रोतांकडून आलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे, एरवी विस्कळीत असलेली माहिती न्यायदानाच्या चार स्तंभांमध्ये एकत्रित केली जाते. हे चार स्तंभ म्हणजे पोलिस, न्यायव्यवस्था, कारागृहे व कायदेशीर सहाय्यता. प्रत्येक स्तंभाचे विश्लेषण आर्थिक तरतूद, मनुष्यबळ, कामाचा भार, वैविध्य, संरचना व प्रवाह (पाच वर्षांच्या कार्यकाळात सुधारणेचे उद्दिष्ट) या मुद्दयांवर केले जाते.

निवृत्त न्यायमूर्ती मदन बी लोकुर या अहवलाविषयी चर्चा करताना म्हणाले, व्यक्तीचा न्यायप्रणालीशी सर्वप्रथम संबंध आल्यानंतर लगेचच या व्यवस्थेतील दंडात्मक प्रक्रिया सुरू होते.

पोलिस ठाण्यांतील कर्मचारी, पॅरालीगल कार्यकर्ते व जिल्हा न्यायालये आदी कायदेशीर सहाय्यता प्रक्रियेतील कर्मचारी या न्यायदान प्रणालीतील पहिल्या फळीला सुसज्ज करण्यात व प्रशिक्षण देण्यात आपल्याला पूर्णपणे अपयश आल्यामुळे जनतेच्या विश्वासाला तडा गेला आहे. समताधारित न्यायाप्रती आपली वचनबद्धता या संस्थाच पूर्ण करू शकतात.

आपल्या संपूर्ण न्यायव्यवस्थेचे बळ या महत्त्वपूर्ण पहिल्या संपर्कबिंदूंमध्ये एकवटलेले आहे. सुधारणांचे प्रमाण कमी आहे आणि संसाधनांकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे सुधारणा झालेल्या नाहीत हे इंडिया जस्टिस रिपोर्टच्या चौथ्या आवृत्तीतून अधोरेखित होते. त्यामुळे न्यायाच्या प्रतिक्षेतील व्यक्तींवरील ओझे कायम राहते आणि ते ओझे न्याय पुरवण्याची जबाबदारी असलेल्या सरकारांवर येत नाही.

इंडिया जस्टिस रिपोर्टच्या मुख्य संपादक श्रीमती माया दारूवाला म्हणाल्या, भारत लोकशाहीच्या शंभर वर्षांच्या दिशेने जात असताना, न्यायव्यवस्थेत सुधारणा झाल्याखेरीज कायद्याच्या राज्याचे व समान हक्कांचे वचन देणे निरर्थक आहे. सुधारणांना पर्याय नसतो. त्या करणे अत्यावश्यक असल्याचे माया दारूवाला यांनी म्हटले आहे.

# विमानसेवेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज शुभारंभ






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.15) -** अमरावती विमानतळ व प्रवाशी विमानसेवेचा शुभारंभ बुधवार, दि. 16 एप्रिल रोजी सकाळी 10.30 वाजता अमरावती विमानतळ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी एअर इंडिया उड्डाण प्रशिक्षण संस्थेच्या विमान उड्डाणाचे प्रात्यक्षिक होणार आहे.

यावेळी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार किरण सरनाईक, धिरज लिंगाडे, संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रतापदादा अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित राहतील. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी केले आहे.

## पोलीस विभागाच्या निवासस्थान इमारतींचे लोकार्पण

मुख्यमंत्री यांच्या हस्ते अमरावती ग्रामीण पोलीस घटकातील मौजे कोंडेश्वर येथील व इतर ठिकाणच्या प्रशासकीय इमारती आणि निवासस्थान इमारतींचा तसेच शासकीय चारचाकी वाहनांचा लोकार्पण कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम उद्या दुपारी 12 वाजता सर्वे नंबर 29, मौजा बडनेरा, (कोंडेश्वर) येथे होणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले आहे. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयातील वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष तसेच

## महिला विसावा कक्षाचे लोकार्पण कार्यक्रम

पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांच्यासाठी वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष व महिला विसावा कक्षाचे लोकार्पण कार्यक्रम पोलिस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांच्यासाठी वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष व महिला विसावा कक्षाचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या दुपारी 12 वाजता याच ठिकाणी करण्यात येणार आहे. जिल्हा वार्षिक योजना सन 2024-25 अंतर्गत जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांच्याकडून मंजूर अनुदानातून पोलीस आयुक्त कार्यालयासाठी वाहने, वातानुकूलित वाहतूक कक्ष व महिला विसावा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

# ट्रक-पोलिस वाहनाच्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

## मोझरी ते तिवसा रस्त्यावरील घटना, एक गंभीर जखमी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** ट्रक आणि पोलिसांच्या वाहनामध्ये झालेल्या अपघातानंतर दुचाकीचीही धडक लागल्याने एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला. ही घटना मोझरी ते तिवसा रस्त्यावर 15 एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास घडली. जीतू अळसपुरे (रा. तिवसा) असे मृताचे नाव आहे. या अपघातात नामदेव ठाकरे (रा. तिवसा) हा जखमी झाला असून, त्याला उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

माहितीनुसार, जीतू अळसपुरे आणि नामदेव ठाकरे हे दोघेही मोझरीहून तिवसा येथे दुचाकीवरून जात होते. दरम्यान नवीन बायपासवरून ते जात असताना, एका ट्रकची समोरून येणाऱ्या पोलिसांच्या वाहनाला धडक लागली. त्याचवेळी अचानक झालेल्या या अपघातात मागून येणारी त्यांची दुचाकी अपघातग्रस्त वाहनावर जाऊन धडकली. या अपघातात जीतू अळसपुरे गंभीर जखमी झाले. त्यांना नागरिकांच्या मदतीने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. या अपघातात नामदेव ठाकरे जखमी झाले आहेत, त्यांच्यावर उपचार सुरू झाले आहेत. या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. परंतू पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून वाहतूक पूर्ववत केली. या अपघातात पोलिसांच्या वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

## मोटर सायकलची चाबी दिली नाही बालकाची आत्महत्या

**चुरणी** -चिखलदरा तालुक्यातील अतिशय दुर्गम गाव बुटीदा येथे आज सकाळी दहाच्या दरम्यान मंगळवारी सकाळी 10 वाजताच्या दरम्यान राज रवी अखंडे (12 वर्षे) या मुलाने मोटारसायकल ची चाबी आईने न दिल्याने गळफास घेऊन आत्महत्या राहत्या घरी दोरीने आत्महत्या केली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. या बालकाच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करण्यात आले. चुरणी ग्रामीण रुग्णालय येथे पोस्टमार्टम करून मृतदेह नातेवाईकांच्या हवाली करण्यात आले.

## जिजाऊ कॉलनीत घरफोडी

**31 हजारांचा मुद्देमाल लंपास**

**अमरावती** - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या जिजाऊ कॉलनीत चोरीची घटना 13 एप्रिल रोजी उघडकीस आली आहे. चेतन राऊत (38) या रहिवाशाच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी 31 हजार 920 रुपयांचा विद्युत वायरिंगचा मुद्देमाल लांबवला. राऊत हे आपल्या कुटुंबासह काही दिवसांसाठी बाहेरगावी गेले होते. दरम्यान, 11 एप्रिल रोजी ते परत आल्यानंतर त्यांना घराची अवस्था पाहून धक्का बसला. घरातील विद्युत वायरिंगची कामे सुरु असताना चोरट्यांनी संधी साधून 2.5 मिमी आणि 6 मिमीच्या तारेचे एकूण 31,920 रुपयांचे वायर चोरी केले. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात राऊत यांनी तक्रार दाखल केली असून, तपास अधिकारी म्हणून पो.ना. संजय दखोरे यांच्याकडे तपास सोपवण्यात आला आहे. मात्र, अशा घटना वारंवार घडत असूनही पोलीस प्रशासनाची उदासीन भूमिका जनतेच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. विशेष म्हणजे, या घरफोडीमागे स्थानिक पोलिसांच्या सहभागाचीही कुजबूज नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी होत आहे. या घटनेने गाडगेनगर परिसरातील नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 16 प्रकारच्या पशुधनाची माहिती संकलीत

## महिनाभरात कळेल अंतिम आकडेवारी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** 21 व्या पशुधन गणनेत जिल्ह्यात प्रगणकांकडून गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी व कुक्कुटपालन, भटक्या प्राण्यांसह 16 प्रकारच्या पशुधन जातीची माहिती संकलित करण्यात आली आहे. जिल्ह्यात 21 वी पशुगणना आटोपली आहे. पुढील महिनाभरात गोळा केलेल्या पशुधनाच्या आकड्यावर अंतिम शिक्कामोर्तब होणार आहे. येत्या महिनाभरात राज्यासह जिल्ह्यातील पशुधनाची माहिती उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यानंतर जिल्ह्यात नेमके किती पशुधन घटले आणि वाढले याचे चित्र स्पष्ट होणार आहे. याव्यतिरिक्त, भटक्या समुदायांकडे असलेल्या भटक्या जनावरांची आणि शहरी व ग्रामीण भागातील गोशाळांतील



जनावरांचीही गणना केली जात आहे.

पशुगणनेसाठी जिल्ह्यात 223 प्रगणक व 56 पर्यवेक्षकांची नेमणूक केली होती. ही पशुगणना पहिल्यांदाच ऑनलाईन अर्थात ॲपद्वारे करण्यात आली. पशुगणनेमुळे जिल्ह्यातील पशुधनाची संख्या निर्धारित होऊन त्यानुसार राज्य शासनाला धोरण आखून योजनांची सुसूत्रता करता येणार आहे. यात 16 पशुधन जाती, कुक्कुट पक्षी यांची प्रजातीनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय माहिती संकलीत केली आहे. 20 व्या पशुगणनेनुसार जिल्ह्यात गाय वर्गीय, म्हैस वर्गीय असे एकूण 5 लाख 94 हजार 594 इतके पशुधन आहे. याशिवाय मेंढी 83 हजार 200 आणि शेळी 340681 आहेत. जिल्ह्यात 21 वी पशुगणना 25 नोव्हेंबर ते 28 फेब्रुवारी 2025 या दरम्यान पशुसंवर्धन विभागाच्या वतीने शहर, ग्रामीण भागात पशुगणना राबविण्यात आली. या पशुगणनेची माहिती ऑनलाईन पध्दतीने नोंदविली आहे.

> 21 वी पशुगणना पूर्ण झाली आहे. या गणनेची अधिकृत माहिती ही शासनस्तरावर आहे. यावर अंतिम शिक्कामोर्तब केल्यानंतरच जिल्ह्याची आकडेवारी उपलब्ध होईल.
>
> **डॉ. संजय कावरे, उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग**

पहिल्यांदाच, या गणनेसाठी विशेष मोबाइल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून प्रगणक घराघरात जाऊन पशुधनाची माहिती गोळा करतात, ज्यामुळे प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेळेची बचत करणारी ठरली आहे. या गणनेद्वारे संकलित केलेली माहिती राज्यात पशुसंवर्धन धोरणे आखण्यासाठी, पशु आरोग्य नियंत्रणासाठी, आणि कृषी व पशुपालन क्षेत्रातील विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरेल. यामुळे शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर योजना मिळविण्यास मदत होईल आणि पशुधनाच्या स्थितीचे स्पष्ट चित्र उभे राहील. अधिकृत आकडेवारी आणि तपशीलवार अहवाल पशुसंवर्धन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

# वरुड - आर्वी बसचे साहूर टोलनाक्यावर 'स्टेअरिंग लॉक'

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि. 15) -** वरुडवरून आर्वी येथे प्रवासी घेऊन जाणाऱ्या वरुड आगाराच्या एसटीबसला नजीकच्या दुर्गवाडा (साहूर) येथील टोलनाक्यावर स्टेअरिंग लॉक झाल्याने अपघात झाला. नशीब बलवत्तर म्हणून जीवितहानी टळली. मात्र बसमधील प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

सविस्तर वृत्त असे की, सोमवारी सायंकाळी 5 च्या सुमारास एमएच 40 -9125 क्रमांकाची बस वरुडवरून आर्वी येथे प्रवासी घेऊन जात होती. या बसमध्ये एकूण सात प्रवासी होते. वरुड-आर्वी मार्गावर साहूर दुर्गवाड्याच्या मध्यभागी उभारलेल्या टोल नाक्याजवळ बस आली असताना बसचे स्टेअरिंग अचानक लॉक झाले आणि त्यामुळे बस टोलनाक्यात शिरली. बस ड्रायव्हर डी. एन. राऊत यांनी बस नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला मात्र स्टेरिंग लॉक झाल्याने काहीच करता आले नाही. अखेर बस टोलनाक्याच्या दुभाजकावर जाऊन आदळली. बसमधील सर्व प्रवासी सुखरूप असून कुणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. जखमी प्रवाशांवर साहूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. अनेक डेपोत जुन्या भंगार गाड्या असल्याने ब्रेक फेल होणे किंवा स्टेरिंग लॉक होणे, हे



नित्याचे झाले असून या भंगार बसेस मुळे नेहमीच छोटे-मोठे अपघात सुरूच असतात. त्यामुळे होणारे अपघात हा चिंतेचा विषय असून शासनाने याकडे लक्ष घालून नवीन बसेसचा भरणा करावा, असे मत ड्रायव्हर-कंडक्टरसह प्रवाशांनी व्यक्त केले. यावेळी वाहक म्हणून एस. एम. बुरे हे सेवेवर होते. अपघात होताच एसटी ड्रायव्हर डी. एन. राऊत यांनी आष्टी पोलिसस्टेशनला जाऊन तक्रार दिली.

# ऑक्सिजन पार्कजवळील झुडपात आढळला मृतदेह

**मृतक राहुल नगरातील रहिवासी**

**अमरावती, (दि. 15)** शहरातील ऑक्सिजन पार्कजवळील झुडपात 15 एप्रिल रोजी एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. या घटनेच्या माहितीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह इर्विन रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला. मृताचे नाव सुभाष मारुती वासनिक (60, रा. राहुल नगर, आशियाना क्लब, अमरावती) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत सुभाषचा मृत्यू एक दिवस आधी झाला असल्याचे समजते. तेथून जाणाऱ्या नागरिकांना एक व्यक्ती झुडुपात पडलेला पाहिला, परंतू तो दारूच्या नशेत असावा, म्हणून कोणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे याबाबत गेल्या दोन दिवसांपासून कुणीही पोलिसांना सांगितले नव्हते. अशातच 15 एप्रिल रोजी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता, तो व्यक्ती मृतावस्थेत दिसला. सुभाषचा मृत्यू कसा झाला हे अद्याप उघड झालेले नाही. फ्रेजरपुरा पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# कचरा करणाऱ्यांवर उपद्रव शोध पथकांचा वॉच

- सार्वजनिक जागांवर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार
- अमरावती महानगरपालिकेतर्फे विविध परिसरात स्वच्छतेची कार्यवाही

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15)** शहराला स्वच्छ, सुंदर करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे उपद्रव शोध पथक आता सार्वजनिक ठिकाणी लघवी करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 50 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या अधिक कठोर कारवाई करणार आहे. याबाबत मनपा उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी उपद्रव शोध पथकांना उपरोक्त निर्देश दिले.

मनपा उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी रस्त्यावर, फुटपाथवर कचरा टाकणारे, थुंकणारे, घाण करणारे, लघवी करणारे, प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्या नागरिकांवर तसेच दुकानदारांवर सुद्धा कारवाई करणे गरजेचे असल्याचे सांगितले. नागरिकांनी किंवा दुकानदारांनी कचरा गाडीवाला स्वच्छता दूताला दिला तर बाजारपेठेत स्वच्छता राखण्यात मोठी मदत होईल. त्यांनी नागरिकांना स्वच्छता ॲपचा सुद्धा वापर करण्याचे आवाहन केले. नागरिकही आपल्या मोबाईलवर ॲप डाउनलोड करून आपली तक्रार नोंद करू शकतील. या तक्रारीचे निवारण मनपातर्फे लवकरात लवकर केले जाईल. त्यांनी सांगितले




की, शोध पथकाचा माध्यमाने नागरिकांमध्ये आणि दुकानांमध्ये जनजागृती केली जाईल. त्यांना स्वच्छता ॲप आणि उपद्रव शोध पथकाच्या दंडाच्या रक्कमेची कल्पना दिली जाईल. यानंतरही बाजारपेठेत कचरा दिसल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. त्यांनी दुकानदारांना आपल्या दुकानात हिरवी आणि निळी कचरा कुंडी ठेवण्याचे आवाहन केले. या कचरा कुंड्यांमध्ये ओला आणि सुका कचरा गोळा केला जाईल. शहरातील सर्व नागरिकांनी जबाबदारपणे शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचे ठरविल्यास अमरावती शहर सुद्धा स्वच्छता रँकिंगमध्ये उच्चांक गाठू शकतो. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने विविध परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. मध्य झोन क्रमांक 2 राजापेठ प्रभाग क्रमांक 13 अंबापेठ, गोरक्षण प्रभाग अंतर्गत साफ सफाई कंत्राटदार यांच्या द्वारे साफ सफाई कामे करुण घेण्यात आले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्य चित्रा चौक येथे पुतळा परिसराची साफ सफाई करण्यात आली. सदर साफ सफाई कामाची पाहणी वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव व ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे यांच्याद्वारे करण्यात आली. जागो-जागी पडलेले कच-याचे ढीगारे उचलण्यात आले. कंटेनर परिसराची स्वच्छता करण्यात आली. सर्व मुख्य रस्ते साफ सफाई करुण कचरा उचलण्यात आला. तसेच मच्छर फवारणी करण्यात आली. स्थायी सफाई कामगार यांच्या द्वारे मुधोळकर पेठ येथे स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे शहरातील अनेक परिसरात ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

# रवी नगरमध्ये तरुणाची हत्या

## सीआययूच्या पोलिसांनी केली तीन आरोपींना अटक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 15) -** काही दिवसांपूर्वी धार्मिक उत्सवादरम्यान स्थापन झालेल्या मंडळात अध्यक्षपदाच्या वादातून एका तरुणाची हत्या सोमवारी रात्री उशिरा 2 वाजता हत्या करण्यात आली. तीर्थ गजानन वानखडे (36, रा. रविनगर, अमरावती) असे मृताचे नाव आहे. ही घटना राजापेठ पोलीस स्टेशन परिसरातील रवी नगरमध्ये घडली. या प्रकरणात पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांचे विशेष पथक सीआययूने तीन आरोपींना खंडेलवाल नगरच्या जंगल परिसरातून अटक केली आहे. सूरज वसंतराव बघेकर (36, रा. अंबा विहार, अमरावती), चेतन विनोद पिंजरकर (36) आणि रोशन विनोद पिंजरकर (40, दोन्ही रा. पटवीपुरा, अमरावती) अशी अटक आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील रवी नगरमध्ये सोमवारी रात्री उशिरा जुन्या वादातून तीर्थ वानखडे यांच्यावर धारदार शस्त्रांनी तीन ते चार वेळा वार करून गंभीर जखमी करण्यात आले. त्यानंतर तीर्थ वानखडेला त्याच्या कुटुंबीयांनी गंभीर जखमी अवस्थेत एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतू मंगळवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. त्यांचा शोध राजापेठ पोलिसांसह सीआययू टीम घेत होती. तिन्ही आरोपींना खंडेलवाल नगर परिसरातून अटक करण्यात आली.

### अध्यक्षपदावरून वाद

अटक केलेल्या आरोपी सूरज, चेतन आणि रोशन यांच्या चौकशीत त्यांनी सांगितले की, हा हल्ला जुन्या वादातून करण्यात आला होता. धार्मिक उत्सवावर काढलेल्या मिरवणुकीवर बहिष्कार टाकण्यावरून आणि तीर्थ वानखडे यांच्या अध्यक्षपदावरून वाद झाला. त्यामुळे तिर्थ याची हत्या करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

### या पथकाची कामगिरी

सदर कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक महेंद्र इंगळे, विनय मोहोड, सुनील लासुरकर, जहीर शेख, अतुल संभे, राहुल ढेंगेकर, विनोद काटकर यांनी केली.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# भाऊसाहेबांच्या नावाला 71.8 टक्के समर्थन

## समर्थकांचा दावा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 15)** अमरावती विमानतळाला 'डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, असे मत आज समाज माध्यमावर घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात 71.6 टक्के अमरावतीकरांनी व्यक्त केले पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे विद्यार्थी आणि क्रांती नवनिर्मित राष्ट्रीय संघटन यांनी गुगल फॉर्मच्या माध्यमाने हे सर्वेक्षण घेतले होते.




अमरावती विमानतळाच्या नावावरून सध्या जो गोंधळ सुरु आहे तो लक्षात घेता अमरावतीकरांना काय वाटते ?,हे



जाणून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले. 'अमरावती विमानतळाला कोणाचे नाव द्यावे ?',असा प्रश्न लोकांना विचारण्यात आला आणि त्या प्रश्नाला 'शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख' आणि 'प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज' असे दोन पर्याय देण्यात आले. आज सायंकाळपर्यंत एकूण 427 लोकांनी या सर्वेक्षणाला प्रतिसाद दिला त्यापैकी 71.8 टक्के लोकांनी 'डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे, असे मत नोंदविले तर 28.2 टक्के लोकांनी प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज यांच्या नावाला पसंती दर्शविली.

डॉ.भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्याची महती लक्षात घेता तसेच वैदर्भीय जनतेच्या भावना जपण्याची संधी सरकारला प्राप्त झाली आहे म्हणून अमरावती विमानतळाला डॉ.पंजाबराव देशमुख यांचे नाव देणे संयुक्तिक राहील,असे मत बहुतांश प्रतीसादकांनी व्यक्त केले.प्रतीसादकांनी गुलाबराव महाराज यांच्या कार्याचीही महती व्यक्त करून त्यांच्या विषयी आदर व्यक्त केला आहे.

# अमरावती जिल्ह्यात आयपीएल वर सट्टा जोरात सुरू

## कोट्यवधी रुपयांची उलाढाल ■ पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.15 )–** अमरावती जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात अवैध धंद्यांवर अंकुश मिळविल्याचा दावा पोलिसांकडून केला जात असला, तरी सध्या सुरू असलेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यांवर संपूर्ण जिल्हाभर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सट्टा खेळला जात असल्याची चर्चा आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या गैर प्रकारावर लक्ष ठेवण्याचे आदेश आधीपासूनच पोलीस प्रशासनाला दिले असले, तरी त्यांच्याकडून या आधुनिक जुगाराकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे.

सध्या आयपीएलचे अर्ध्याधिक सामने संपत आलेले आहेत. ही स्पर्धा दिवसेंदिवस जसजशी रंगात येत आहे, तसतसे आयपीएल वर सट्टा खेळण्याचे प्रमाणही वाढले आहे. शहरानंतर ग्रामीण भागातही आयपीएल सट्ट्याचे लोन पोहोचले असून वेगवेगळे कोड वापरून हे रॅकेट सुरू असल्याचे समजते. याबाबत स्थानिक पोलिसांना कुठलीही माहिती नसणे, ही बाब पचनी पाडून घेणे कठीण असल्याने पोलिसांच्या संगनमतातूनच आयपीएल क्रिकेट सट्टा सुरू असल्याची चर्चा आहे.



### हा परिसर बनला सट्ट्याचे केंद्र

अमरावती शहरात राजकमल चौक, गाडगे नगर, राजापेठ, मालटेकडी येथे तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात चांदूरबाजार, वरूड, मोर्शी, परतवाडा, चांदुर रेल्वे, तिवसा, दर्यापूर या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आयपीएल सट्ट्याचे ची केंद्र आहेत. येथून मोठ्या प्रमाणावर सट्टा खेळला जातो. अनेक ठिकाणी पान टपरी मधून आयपीएल वर सट्टा लावण्याचे प्रकार सुरू आहेत. नाणेफेकीपासून तर प्रत्येक षटकार, चौकार व सामन्यातील विविध घडामोडींवर शौकीन सट्टा लावून गैर मार्गाने नशीब आजमविताना दिसत आहे. पोलिसांची कारवाई टाळण्यासाठी या अवैध व्यावसायिकांनी नवीन मोबाईल ?प ही तयार केले असल्याची माहिती आहे. त्यावर वेगवेगळे कोडवर्ड वापरून व्यवहार होतो. पैसा लावल्यानंतर जिंकलेल्या संबंधित व्यक्तीला आठ दिवसानंतर रक्कम अदा केली जाते. वेटिंग ॲप वर पैसे ऐवजी पॉईंट असा उल्लेख करण्यात येत आहे. पोलीस कारवाई झाल्यास कायद्याच्या कचाट्यात सापडू नये याकरिता हा पर्याय शोधण्यात आला आहे. ॲप मधील अकाउंट मध्ये जमा होणाऱ्या पॉईंटवर रक्कम ठरवून तिची देवाणघेवाण केली जाते.

### सट्टेबाजांना सुगीचे दिवस

आयपीएल क्रिकेट सामने हे सट्टेबाज आणि पोलीस दलातील काहींसाठी सुगीचे दिवस असतात, असे बोलले जाते. तब्बल दोन महिने हा गैरप्रकार संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात चालतो, असे सांगण्यात येते. लाखो रुपयांची उलाढाल असलेल्या या अवैध व्यवसायात शहरातील अनेक डॉक्टर प्रतिष्ठित नागरिक व्यापारी सहभागी असल्याची माहिती आहे अमरावती जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अभिलाष कुमार यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायावर अंकुश मिळविण्यासाठी फ्लश आऊट योजना आणली होती. त्याअंतर्गत अनेक ठिकाणी कारवाई झाली होती. पण आता मात्र क्रिकेट सामन्यावर सट्ट्याबाबत पोलिसांकडून कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच हा अवैध व्यवसाय शहर व ग्रामीण भागात जोरात सुरू आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी क्रिकेट सट्ट्या संदर्भात गुन्हे अन्वेषण विभागाला काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या होत्या, पण या विभागातील काही अधिकारी व कर्मचारीच या व्यवसायात गुंतले असल्याचे बोलले जात आहे. सध्यातरी पोलीस प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने अमरावती जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात आयपीएल वरील क्रिकेटचा सट्टा जोरात सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी बाबासाहेब जयंतीचा उत्साह

## बाबासाहेबांच्या विचार कार्याचे अनुकरण करा– कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यापीठाच्यावतीने अभिवादन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 15)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या रुपाने महत्वपूर्ण देणगी देशाला दिली आहे. संविधानात चेक्स ॲन्ड बॅलन्स सिस्टीम दिली असून आपल्या देशात संविधान विरोधी कुठलीही कृती करता येत नाही. नागरिकांना दिलेले हक्क अबाधित ठेवण्यासाठी संविधान महत्वपूर्ण कायदा आहे. देशात समानता प्रस्थापित व्हावी, या उद्देशाने बाबासाहेबांनी कार्य केले असून त्यांच्या विचार व कार्याचे अनुकरण करुन आपल्या देशाच्या विकासामध्ये हातभार लावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठातील संविधान शिल्प या ठिकाणी आयोजित अभिवादन सोहळा कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून निवासी जिल्हाधिकारी श्री अनिल भटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र मुन्द्रे, प्रा. श्रीकांत काळीकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने विद्यापीठ परिसर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यान भव्यदिव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, निवासी उपजिल्हाधिकारी श्री अनिल भटकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, अधिसभा सदस्य डॉ. रविंद्र मुन्द्रे, प्रा. श्रीकांत काळीकर, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी पुष्पार्पण करुन रॅलीला सुरुवात झाली. तत्पूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व मेणबत्तीप्रज्वलन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते करण्यात आले. रॅलीमध्ये 'बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणा देत रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहोचली. यावेळी विद्यापीठ प्राधिकारिणींचे सदस्य, प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

#### पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी माती भांडे वितरण

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व उपस्थितांच्या हस्ते उन्हाळ्यामध्ये निसर्गातील पशुपक्षी यांना पाणी पिण्यासाठी नागरिकांना मातीचे भांडे वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सदस्य, प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

#### भातकुलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

भातकुली येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे उपस्थित शिक्षकांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहारअर्पण करण्यात आले तसेच यावेळी सहाय्यक शिक्षिका संगीता चूनकी कर, व खर्चान मॅडम यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली यावेळी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



#### संविधान उद्देशिका व ग्रंथ वितरण

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विद्यापीठाच्यावतीने हारार्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच याठिकाणी असलेल्या स्टॉलवरुन भारतीय संविधान उद्देशिका व ग्रंथांचे वितरण कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते उपस्थित नागरिकांना करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. मनिषा कोडापे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे, डॉ. जागृती बारब्दे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड आदी उपस्थित होते.

#### मनपात बाबासाहेब यांची जयंती उत्साहात साजरी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात अमरावती महानगरपालिकेत साजरी करण्यात आली. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांचे हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले. यावेळी उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, उपअभियंता प्रमोद इंगोले, उद्यान निरीक्षक मुकेश खारकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, राजेश राठोड, विनोद निचत, प्रमोद मोहोड, विष्णू लांडे, भुषण खडेकार, ऋषिकेश चावरे, राकेश पाटील, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अभिनेता सर्जेराव गलपट यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आधारीत गीत गायन सादरीकरण केले. नंतर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास हारार्पण करण्यात आले. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभुषेत सर्जेराव गलपट यावेळी उपस्थित होते.

### नगरपरिषद उर्दू शाळेत आनंद मेळावा कार्यक्रम

**दर्यापूर –** शहरातील डॉ. अल्लामा इकबाल नगरपरिषद उर्दू प्राथमिक मुलींची शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ या मेळाव्यात आणले होते. या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यवहार ज्ञान, नफा व तोटा याचे महत्व जाणून घेतले. याचबरोबर उद्योजगतेच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. बेग, मुख्याध्यापक वाहिदोद्दीन शेख यांची उपस्थिती होती. नावेद सय्यद यांच्या हस्ते फीत कापून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला मोहम्मद नदीम खान, मोहम्मद फुरकान, नवेद, बेनझीर यांची उपस्थिती होती.

### अडुळा बाजार येथील माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले जयंती

**अडुळा बाजार –** विदर्भ विकास शिक्षण संस्था, येवदाद्वारा संचालित माध्यमिक विद्यालयात समाज क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख विनायक चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक बजरंग हाडोळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजू कोलटके, जिल्हा परिषद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक शकील, लहानुजी महाराज उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक शकीर, प्रकाश लिंगोट, निता मळसणे, जावेद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन जुनगरे, संचालन अनिल तायडे व आभार प्रदर्शन अनिल श्यामतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भानुदास मावळे व प्रदीप कंटाळे यांनी सहकार्य केले.

## गांधी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



**महासागर प्रतिनिधी**
**बडनेरा, (दि. 15)** येथील न्यू एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या अनिता सदाफळे या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्या वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिलीप इखार, कमल चांडक, सुनंदा उके, मनोरमा उईके, शोभा खंडारे उपस्थित होत्या.याप्रसंगी शिक्षिका सुनंदा उके ह्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. तसेच गंगा भैसणे व निलिमा देव ह्यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सुद्धा आपली मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्या अनिता सदाफळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती झलके व आभार प्रदर्शन खुशी अंबाडकर यांनी केले.

### राजर्षी शाहू महाराज वाचनालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा –** येथील श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. वाचनालयातील विद्यार्थी मनीष थोरात यांच्या हस्ते भाऊसाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित सौरभ इंगळे, अक्षय देशमुख, प्रगती ठाकरे, पायल ढेवले, प्रिया डहाके, चेतन लकडे, अनुजा गावंडे, रुपाली राऊत, अंकुश केवदे, रितेश बागडे, रोशन डगवार, विशाल गडलिंग, सूरज कपले, प्रणाली कमळापुरे, तेजस्वी ठाकरे, यांनीही भाऊसाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले.

# चुरणी गावाला टँकरने पाणीपुरवठा केव्हा?

### पाणीप्रश्न पेटण्याच्या मार्गावर

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.15 )–** येथील ग्रामपंचायत प्रशासनात नियोजनाचा अभाव असल्यामुळे गावकऱ्यांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. 8 महिने झोप काढत असलेले हे प्रशासन उन्हाळ्यातही झोप काढताना दिसत आहे. भर उन्हाळ्यामध्ये चुरणीवासीयांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. असे असतानाही ग्रामपंचायत प्रशासनामार्फत पाणीटंचाई निवारणाकरिता मात्र आतापर्यंत कुठल्याही ठोस उपाय योजना करण्यात आल्या नाही. वरिष्ठ स्तरावर पाणीटंचाई निवारणार्थ



पत्रव्यवहार झाला किंवा नाही हे अद्याप कळले नसले तरी आतापर्यंत चरणी गावामध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेल्या नाही त्यामुळे आता गावातील पाणी प्रश्न पेटण्याच्या मार्गावर असल्याचे दिसत आहे.

चिखलदरा तालुक्यातील चुरणी हे महत्त्वाचे आणि लोकसंख्येने मोठे असलेले गाव आहे. उन्हाळा आला की या गावावर दरवर्षी पाणी संकटही ओढवते. गावातील भूजल पातळी वाढविण्याकरिता कुठल्याही उपाययोजना होत नसल्याने उन्हाळ्यात पाण्याचे सार्वजनिक स्त्रोत आटतात. त्यामुळे सार्वजनिक विहिरी व हातपंप निकामी होतात. गावात पाण्याची सोय नसल्याने महिला वर्गाला पायपीट करून दोन ते तीन किलोमीटर वरून भर उन्हात पाण्याचे घडे आणावे लागतात. अशी भीषण परिस्थिती असतानाही येथील जबाबदार असलेले ग्रामपंचायत प्रशासन मात्र पांढरा हत्ती करत आहे या प्रशासनाकडून पाणीटंचाई पूर्व कुठल्याही उपाययोजना केल्या जात नाही इतकच नव्हे तर पाणीटंचाईनंतरही पाणीटंचाई निवारणार्थ ठोस पाऊल सुद्धा उचलले जात नाही विंधन विहीर अधिग्रहण करणार असल्याचे जरी ग्रामपंचायत प्रशासनामार्फत सांगितला जात असले तरी गावात भीषण पाणीटंचाई असतानाही अजून पर्यंत पाण्याचे स्त्रोत अधिक्रहित करण्यात आले नाही टँकरचा पुरवठा करण्यात आला नाही त्यामुळे आता पाण्याकरिता चुरणी ग्रामस्थ रस्त्यावर उतरतील असे चिन्ह दिसत आहे.

> “गेल्या दोन महिन्यापासून चुरणी ग्रामवासी पाणीटंचाईने हैराण आहे. याला सर्वस्वी जबाबदार ग्रामपंचायत प्रशासन आहे. आहे ग्रामपंचायतने पाणीपुरवठा संबधात कुठल्याही प्रकारचे नियोजन नसल्याकारणाने पाणीटंचाईची भीषण परिस्थिती चुरणी गावात ओढवली आहे या कामात कुचराई करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी आणि प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे.
>
> **आकाश अलोकार**
> **ग्रामस्थ, चुरणी.**

# मराठी भावसंगीतात पुन्हा अवतरणार वसंत ऋतू


**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 15 ) –** कविवर्य सुरेश भट यांच्या लेखणीतून साकारलेल्या गझला अनेक वर्षांनी रसिकांच्या भेटीला येत आहेत. मराठी गझलांच्या नवीन अल्बमचे विमोचन पद्मश्री सुरेशजी वाडकर यांच्या हस्ते मुंबई येथे 15 एप्रिल 2025 रोजी होत आहे. सोशल मीडिया तसेच विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून कविवर्य सुरेश भट यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या लेखणीतून साकारलेल्या अनमोल 8 गझलांचा ऋतू असे छळतात का? हा अल्बम प्रकाशित होणार आहे.

या अल्बमच्या निर्मितीची संकल्पना प्रा. डॉ. कुणाल इंगळे, संगीत विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांची असून या सर्व गझला त्यांनीच स्वरबद्ध केल्या आहेत. या अल्बममध्ये चित्रपटसृष्टीतील दिग्गज गायकांनी गायन केले आहे. ज्यामध्ये भजन –गझल सम्राट अनुप जलोटा, पद्मश्री सुरेश वाडकर, महागायिका वैशाली माडे यांचा समावेश आहे. तसेच काही गझल स्वत: प्रा.डॉ.कुणाल इंगळे यांनी सुद्धा गायिल्या आहेत. आनंदाची गोष्ट म्हणजे अनुप जलोटा यांची मराठी गझल गाण्याची ही पहिलीच वेळ असून श्रोत्यांना नक्कीच ही पर्वणी ठरणार आहे. प्रचलित गझलांपेक्षा वेगळ्या धाटणीच्या आणि शैलीच्या या गझला आहेत. मराठी भाव संगीतात या गझलांमुळे एका नवीन युगाचा प्रारंभ होत आहे. कारण संगीतकार म्हणून स्वतंत्र अभिजात शैलीत या रचना स्वरबद्ध केलेल्या आहेत. 15 एप्रिल रोजी या अल्बमची पहिली गझल सुरेश वाडकर यांनी गायलेली इतकेच मला जाताना, सरणावर कळले होते, मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते ही गझल सर्व श्रोत्यांकरिता युट्यूब, सोशल मीडिया व ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असेल. या अल्बमचे संगीत संयोजन रविराज कोलथरकर, माधव नील मोहोपात्रा, काबुल बुखारी यांनी केले आहे.

# नियमबाह्य पद्धतीने गुटखा जाळल्याप्रकरणी कारवाई होणार

**महासागरच्या वृत्तानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार ■ अन्न व औषधी विभागावर उल्लंघन केल्याचा ठपका**





Disposal of Siezed Tobacco products by FDA Amravati

From: Ganesh Anasane (ganeshanasane@yahoo.com)
To: roamravati@mpcb.gov.in
Cc: rohq@mpcb.gov.in; collectoramravati@maharashtra.gov.in
Date: Tuesday, 15 April, 2025 at 09:12 am IST

To:
Regional Officer Amravati
Maharashtra Pollution Control Board

Respected Sir, I am writing this complaint letter to inform you regarding the illegal way of disposal of seized Tobacco products by Food and Drugs Administrative Department of Amravati in Dharni region of District Amravati. Please find attached the photographs in which FDA Department destroying (Burning openly) Seized ban Tobacco products in a huge quantity which result in Air pollution and thus responsible for the violation of Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981.
It my kind request please take appropriate action against the FDA department of Amravati and also against responsible officers who is responsible for the violation of Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981 and direct them regarding the proper way of disposal of Seized Tobacco products in future.

Yours faithfully
Ganesh Dadarao Anasane
Dahisath chowk near Vithal Mandir Bhajibazar road Amravati 444601
9607131123

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, (दि. 15)** प्रतिबंधित गुटख्याची तस्करी आणि विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी धाडसत्र राबवून लक्षावधी रुपयांचा गुटखा जप्त केला. मात्र या गुटख्याची विल्हेवाट लावताना पोलिस व अन्न आणि औषधी प्रशासनाने नियमांचे उल्लंघन करुन प्रर्यावरणाला धोका निर्माण होईल, अशी कृती केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. हा गंभीर प्रकार दैनिक महासागरने उघडकीस आणल्यानंतर आता याबाबत प्रदूषण महामंडळाकडे तक्रार दाखल झाली आहे. त्यामुळे धारणी पोलिस आणि अन्न व औषधी प्रशासनावर कारवाईची टांगती तलवार आहे. ही चूक आता धारणी पोलिस आणि अन्न व औषधी विभागाला महागात पडू शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

यासंदर्भात प्राप्त माहितीनुसार धारणी पोलिसांनी आपल्या हद्दीत प्रतिबंधित गुटख्याची विक्री आणि तस्करी रोखण्यासाठी 2024 या वर्षात राबविलेल्या मोहिमेतून 26 लाख रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू जप्त केला होता. हा गुटखा अन्न सुरक्षा अधिकारी व धारणी पोलिसांनी धारणी नगरपंचायतच्या खा ?या रोडवरील कचरा डपिंग ग्राऊंडवर जाळून नष्ट केला. सुरक्षा विभागाचे अधिकारी घनश्याम दंडे, धारणीचे ठाणेदार अशोक जाधव, पोलिस उपनिरीक्षक सतिश झालटे, महिला पोलीस दिपाली सलाडे, गजानन जामनिक, पंचायत समितीचे कर्मचारी आकाश फस्कुलवार, नरेंद्र ठाकरे यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. मात्र गुटखा नष्ट करण्याची ही पद्धत अवैज्ञानिक व पर्यावरणाला धोका निर्माण करणारी असल्याचे निदर्शनास आले. ही कार्यवाही करताना आवश्यक असलेली पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचेही उघड झाले. त्यामुळे ही प्रक्रियाच वादाच्या भोवऱ्यात सापडली.

धारणी पोलिसांनी उघड्यावर गुटखा जाळून सन 1989 च्या धोकादायक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमांचे उल्लंघन केले असल्याचा आरोप धारणी पोलिसांवर करण्यात आला आहे. अशा पदार्थांची विल्हेवाट लावण्याकरिता नागपूरच्या बुट्टीबोरी एमआयडीसीमध्ये महाराष्ट्र एनवॉरमेंटल लिमीडेट नावाची कंपनी आहे. जेथे असे पर्यावरणासाठी अपायकारक असलेले साहित्य नष्ट केले जाते. याची माहिती असतानाही धारणी पोलिसांनी हा प्रकार करुन पर्यावरणाला धोका निर्माण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. महासागरने हे प्रकरण उघडकीस आणल्यानंतर वसुंधरा फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश अनासाने यांनी याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार नोंदविल्याने कारवाईची शक्यता बळावली आहे.

# चौधरी चौक ते विलास नगर मार्गावरील अतिक्रमण हटविले

**महानगरपालिकेची मोठी कारवाई ■ 50 हातगाड्या जप्त**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 15) –** अमरावती महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून शहरातील अतिक्रमन हटविण्यासाठी मोहिम हाती घेण्यात आली आहे. हातगाड्या, टप ?या व रस्त्याच्या कडेला बसलेल्या पथारीवाल्यांवर ही कारवाई करण्यात येत आहे. त्याअंतर्गत अतिक्रमण विभागाने चौधरी चौक ते विलास नगर रोडवर अतिक्रमण निर्मूलनाची मोठी कारवाई केली आहे. या कार्यवाहीत 50 हातगाड्या जप्त करण्यात आल्या.

मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या निर्देशावरून महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने हातगाड्या, टप ?या व तीनचाकी व चारचाकी वाहनांवर कारवाई केली जात आहे. त्याचप्रमाणे अनधिकृत फ्लेक्स जप्त करण्यात येत आहेत. शहर अतिक्रमणमुक्त व्हावे यासाठी सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, उपअभियंता प्रमोद इंगोले यांच्या नेतृत्वात पाच ट्रक व जेसीपीसह अतिक्रमण विभागाने चौधरी चौक ते विलास नगर रोडवर अतिक्रमण निर्मूलनाची मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे या परिसरातील अतिक्रमनकर्त्या व्यावसायिकांची चांगलीच तारांबळ उडाली होती.

अमरावती शहरातील अनेक पदपथांवर विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. शहरातील मुख्य चौकांमध्ये सायंकाळी हातगाडी, पथारीवाले मोठ्या संख्येने ठाण मांडून असतात. काही व्यावसायिकांनी पदपथांवर दुकानाचे साहित्य मांडल्याचे दिसून येते. प्रशस्त रस्त्यांमुळे शहराची वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणे अपेक्षित आहे. मात्र काही रस्त्यांचा अपवाद वगळता बहुतांश रस्त्यांवर अतिक्रमण झाले आहे. अमरावती शहरातील रस्त्यावर वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात होते. खरेदी-विक्रीसाठीची वाहने तेथे भर रस्त्यावर असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा होऊन सातत्याने कोंडी होते. खरेदी विक्रीच्या चारचाकी वाहनांमुळे पदपथ बळकावले आहेत. विनापरवाना हातगाड्या, टपऱ्या तसेच वाहने उभी करून व्यवसाय केला जातो. यासाठी शहरातील विविध भागात महानगरपालिकेतर्फे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात येत आहे.

# सावंगा विठोबात आलेल्या यात्रेकरुंना 6 क्विंटल प्रसादाचे वितरण

**जेवण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ■ मालखेडवासीयांची 17 वर्षांपासून सेवा**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे, (दि. 15)** तालुक्यातील सावंगा विठोबा येथे गुढीपाडवा ते रामनवमी दरम्यान भरणारी श्री क्षेत्र सावंगा विठोबा देवस्थानची यात्रा संपूर्ण महाराष्टात प्रसिद्ध आहे. यंदाही मोठ्या उत्साहात ही यात्रा पार पडली. राज्यासह देशभरातील हजारो भाविकांनी यात्रेत हजेरी लावली. येथे येणाऱ्या यात्रेकरुंसाठी मालखेड येथील ग्रामस्थ गेल्या 17 वर्षांपासून प्रसाद वितरणाची परंपरा राबवित आहे. यंदाही त्यात खंड पडू न देता यात्रेकरुना 6 क्विंटल प्रसादाचे वितरण करण्यात आले. भाविकांनी त्याचा लाभ घेतला. प्रसादासोबतच पाण्याचे वाटपही मालखेडवासीयांनी केले.

सावंगा विठोबा येथील श्रीकृष्ण अवधूत महाराज यांचे लाखो लोक भक्त आहेत. यात्रेत येणारे भाविक हातात कापूर घेऊन आपल्या मनातील मनोकामना पूर्ण करण्यासाठी महाराजांकडे साकडे घालताना दिसतात. या यात्रेत लाखो रुपयांचा कापूर जाळल्या गेला. महाराजांच्या अनेक ओव्या, भजने भक्तांच्या मुखपाठ आहेत, या ठिकाणी मानसिक आजार दूर होत असल्याची भाविकांची श्रद्धा असून त्यानिमित्तानेही दुरदुरुन भाविक येथे सव्वा महिन्याचे व्रत करण्याकरिता राहतात. अनेकांना अवधूत महाराजांच्या श्रद्धेची प्रचिती आली असल्याचे बोलले जाते. गुजरात, हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश यासह अनेक राज्यातून भाविक मोठ्या संख्येने दरवर्षी येतात. रेल्वे मार्गाने येणारे बहुतांश भाविक हे मालखेड येथे उतरून पायी किंवा मिळेल त्या वाहनाने यात्रेला जातात. त्यांना उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता मालखेड येथील ग्रामस्थांनी जेवण तथा पिण्याच्या पाण्याची सोय केली. गेल्या 17 वर्षांपासून हा उपक्रम सुरू असून मोठ्या उत्साहात सेवेदारांनी यात्रेकरूसाठी व्यवस्था केली. तब्बल 6 क्विंटलचा मसाला भात बनविण्यात आला. तर गावातील मोठा महादेव पचमढी ग्रुप तर्फे देखील गावातील चौकात यात्रेकरूसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिन चौकडे, निरंजन चव्हाण, शेख साजिद शेख जाफर, शेख काशीद, गौरव कडू, विकास चवरे, आशिष गवळी, नितीन पोकळे, चंदू पोकळे, नामदेव पंधरे, शेख तसव्वर, शेख अमीर, समीर पुंड, राजेश सुने, शेख आसिफ, निखिल मारोटकर, स्वप्निल शेंडे, गजानन इंगोले, पंकज वाघाडे, शेख अजहर शेख अमान, योगेश बोरगडे, आशिष मेश्राम, कैलास मेश्राम, सतीश मारोटकर, विजय अंबाडकर, दीपक राऊत, शेख राजू शेख जाफर, अशोक नागदिवे,संजय सोनोणे प्रमोद निचत,विजय कुपाले यांनी परिश्रम घेतले.

## हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन

मालखेड येथून सावंगा विठोबा येथे जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. अनेक भाविक पायी देखील जातात. त्यामुळे त्यांची व्यवस्था व्हावी या हेतूने ग्रामपंचायत कर्मचारी युनियन 4511 तर्फे मालखेड ग्राम पंचायतचे कर्मचारी सचिन चौकडे यांनी प्रसाद व पाणी वितरणासाठी पुढाकार घेतला व हा उपक्रम सुरु झाला. त्यानिमित्ताने गावात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडते. सर्व जाती-धर्मांचे लोक यावेळी सेवेदार होतात.



# जहागिरपूर येथे महाप्रसादाने महोत्सवाची सांगता

**हनुमान जयंती उत्साहात ■ हजारो भक्तांची लावली हजेरी**

**महासागर प्रतिनिधी**
**कुऱ्हा, (दि. 15) –** लक्षावधी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र जहागीरपूर येथील श्री महारूद्र मारूती संस्थान तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यात हजारो भाविक भक्तांनी हजेरी लावली. या महोत्सवाची सांगता 13 एप्रिल रोजी गोपाल काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाने झाला. मोठ्या संख्येने भाविकांनी त्याचा लाभ घेतला.

13 एप्रिलला श्री गुरुदेव सेवा भजनी मंडळ बोर्डा यांचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम झाला. दुपारी 2 वाजता हभप कैलास महाराज लोखंडे यांच्या अमृतवाणीतून किर्तन झाले. सायंकाळी परिसरातील 8 ते 10 वारकरी भजनी मंडळ तसेच 40 ते 45 महिला भजन मंडळ त्यांच्या उपस्थितीत दहिहंडी कार्यक्रमासाठी दिंड्या जहागीरपूर गावातून भक्त निवास याठिकाणी हरिनामाच्या गजरात निघाल्या. त्यामुळे गावात एक वेगळेच चैतन्य संचारले होते.

यावेळी महाआरती करण्यात आली. संस्थानतर्फे कैलास महाराज लोखंडे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थानचे विश्वस्त ओमप्रकाश परतानी, वसंतराव आखरे, मनोज चांडक, गणेश भोंगाडे, गोपाल भैय्या, नितीन कोल्हटकर, हरिश मुंदडा, सुनील भोंगाडे यांच्यासह कर्मचारी आदी उपस्थित होते.

# भारतीय संविधान प्रत्येक भारतीयाला सन्मानाची हमी देते

**डॉ. रमेश अंधारे यांचे प्रतिपादन ■ राहुल मंडळात बाबासाहेबांची जयंती**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 15)** मानवी अधिकारासाठी बाबासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला. हा संघर्ष केवळ सुशिक्षितांसाठी नाही तर सर्व जाती, धर्मातील व्यक्तींसाठी होता. बाबासाहेबांचे कर्तुत्व आणि योगदान देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच संपूर्ण जगात बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केल्या जाते. सर्व जाती-धर्माच्या भारतीय नागरिकांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी देणारं हे भारतीय संविधान बाबासाहेबांनी निर्माण केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रमेश अंधारे यांनी केले.

स्थानिक भूमिपुत्र कॉलनी येथील राहुल व्यायाम प्रसारक मंडळात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बुद्ध वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, सचिव गजानन वानखडे, प्रा. शुभांगी अभ्यंकर, सहसचिव सतीश पुंडकर, प्राचार्य अविनाश पवार, प्रा. सुधाकर गावंडे, पद्मा ढेपे, मंगला वंजारी प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रसंगी आपले विचार व्यक्त करताना अध्यक्ष स्थानावरून समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर म्हणाले की, समाजामध्ये बाबासाहेबांनी उच्च शिक्षणातील जे अनेक पदव्या मिळवल्या त्यातल्या बहुतांशी पदव्या ह्या अर्थकारण, भारतीय चलन, विदेश व्यापाराशी संबंधित आहेत. शिक्षण बाबत त्यांनी सादर केलेले अनेक शोधनिबंध भारताच्या विकासातील अर्थशास्त्री व शिक्षणतज्ञ म्हणून बाबासाहेबांचे योगदान फार मोठे आहे. त्यामुळे त्यांना त्रिवार सलाम केला पाहिजे तसेच शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र देऊन समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण जीवनभर केले.

मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय राज्यघटना निर्मितीत किती मोलाची योगदान आहे हे आपण सगळेच जाणतो. असेही मधुकरराव अभ्यंकर म्हणाले. या कार्यक्रमाप्रसंगी मुकुंद चौधरी, सोपान चोरपगार, संजय श्रीखंडे, राजू वाकोडे, संतोष राठोड, प्रमोद भगत, विकास फसाटे, आकाश वंजारी, अमोल वानखडे, गजानन भोंगरे, सार्थक कोंडे, समर्थ अभ्यंकर, विहान अभ्यंकर, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीवन फसाटे यांनी तर आभार प्रदर्शन शुभांगी अभ्यंकर यांनी केले.

# विद्यापीठात बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीचे 16 एप्रिल रोजी

**मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे शुभहस्ते भूमिपूजन**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 15)-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीचे भूमिपूजन दि. 16 एप्रिल, 2025 रोजी दुपारी 2.30 वाजता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे शुभहस्ते विद्यापीठ परिसरातील क्रीडा संकुल याठिकाणी होणार आहे. भूमिपूजन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल.

भूमिपूजन कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य खा.डॉ. अनिल बोंडे, लोकसभा सदस्य खा. बळवंत वानखडे, खा.अमर काळे, विधान परिषदेचे सदस्य आ.धीरज लिंगाडे, आ.किरण सरनाईक, आ. संजय खोडके, विधानसभा सदस्य आ.रवि राणा, आ. सुलभाताई खोडके, आ.प्रताप अडसड, आ. केवलराम काळे, आ.प्रविण तायडे, आ. राजेश वानखडे, आ. उमेश यावलकर, आ. गजानन लवटे तसेच विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित राहतील.

विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाया महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीसाठी पी.एम. उषा योजनेंतर्गत 8 कोटी व विद्यापीठ साधारण निधीमधून 5 कोटी, असा 13 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध आहे. 13 कोटी रुपये खर्चाच्या भव्यदिव्य इमारतीमध्ये



तळ आणि पहिला मजला होणार असून बांधकामाचे 2401.07 चौ.मिटर क्षेत्रफळ असणार आहे. या इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू करण्यात येत आहे. हा उपक्रम विद्यापीठाच्या दूरदृष्टीचा भाग असून, विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडाप्रेम आणि संघभावना जोपासण्यासाठी प्रभावी पायाभूत सुविधा निर्माण करणे, हे मुख्य उद्दिष्ट आहे.

या संकुलात बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, जिम्नॅस्टिक्स, बुद्धीबळ, योग आणि मार्शल आर्ट्स यांसारख्या विविध इनडोअर क्रीडांचा समावेश करण्यात येणार आहे. खेळाडूंच्या गरजांचा विचार करून ही इमारत आधुनिक डिझाईननुसार उभारले जात आहे. यामध्ये दर्जेदार फ्लोअरिंग, योग्य प्रकाशयोजना, वायुवीजन, बदलण्याची खोली, प्रेक्षक आसन व्यवस्था तसेच दिव्यांगांसाठी सुलभ प्रवेश, आदी सुविधा उपलब्ध असतील. बहुउद्देशीय सभागृह केवळ खेळांसाठीच नव्हे, तर दीक्षांत समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, विद्यापीठस्तरीय समारंभ तसेच सामुदायिक उपक्रमांसाठीही वापरले जाणार आहे. हे सभागृह विद्यार्थ्यांना आपले कौशल्य, विचार आणि प्रतिभा व्यक्त करण्यासाठी एक खुले व्यासपीठ प्रदान करेल.

हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या जीवनकौशल्य व शारीरिक शिक्षणविषयक उद्दिष्टांशी सुसंगत असून, विद्यापीठाच्या 'आरोग्यदायी आणि सक्रिय परिसर' निर्मितीच्या बांधिलकीचा एक भाग आहे. हे संकुल विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि स्पर्धेच्या संधी उपलब्ध करुन देण्याबरोबरच विदर्भासारख्या भागातून नवोदित क्रीडा प्रतिभा ओळखून त्या घडवण्याचे कार्यही करेल. ही नवीन इमारत व सभागृह विद्यापीठाच्या प्रगतीच्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा ठरेल आणि येणाया अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान बनेल, असा विकास व्यक्त केला जात आहे.

तरी क्रीडा संकुल परिसरातील बहुउद्देशीय सभागृह व आंतरगृह क्रीडा इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमाला सर्वांनी जास्तीजास्त संख्यने रहावे, असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

# अचलपुरात अल्पवयीन मुलीची छेडखाणी

**अमरावती –** अचलपूरातील गांधी पुलाजवळ एका अल्पवयीन मुलीची छेडखाणी करणायात आली. ही घटना 11 एप्रिल रोजी उघडकीस आली. पिडित मुलीच्या तक्रारीवरून आरोपी मोहम्मद अमन मोहम्मद सादीक (20, रा. अंबाडा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'श्री. प्रकाश मंगलजी पंचबुद्ध' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे सातरगाव, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 150. वार्ड क्रं. 1, ता. नांदगाव खंडेश्वर, जिल्हा. अमरावती.

चतु: सीमा: पूर्व- गोपाल शेंडे यांचे घर — उत्तर- रस्ता
पश्चिम- नितीन पंचबुद्ध यांचे घर — दक्षिण- शेत

सदर मिळकत नामे श्री. प्रकाश मंगलजी पंचबुद्ध यांना ग्रामपंच्यायत सातरगाव यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी "PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/ सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

# निरामय



यु गोव्ह आणि मेझॉन अलेक्सा यांनी दहा शहरांमध्ये भारतीय कुटुंबाच्या झोपण्याच्या सवयीचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात दिसून आले की, नियमित झोपण्याची सवय न पाळलेल्या ५३ टक्के लोकांना झोपेशी संबंधी समस्या जाणवत आहेत. झोपण्याची नियमित दिनचर्या ठेवल्यास ५४ टक्के उत्तरदात्यांना झोपेत चांगली सुधारणा दिसून आली.

## ५३ टक्के लोकांना झोपेशी संबंधित समस्या

डॉ. महेश दळे

सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ८६ टक्के लोक दररोज रात्री आठनंतर झोपतात. त्यापैकी ५३ टक्के लोकांना रात्री साडेदहा नंतर झोपायला आवडते. या लोकांना झोपण्यापूर्वी व्हिडीओ कंटेंट पाहणे (६३ टक्के), कुटुंब आणि मित्रांशी बोलणे (५९ टक्के), पॉडकास्ट, म्युझिक किंवा ऑडिओबुक ऐकणे (५८ टक्के) तसेच 'सोशल मीडिया' ॲपवर स्क्रोल करणे (५७ टक्के) आवडते.

**झोपण्यासाठी व्हाईस असिस्टंटची मदत**

केवळ जोडपे राहत असलेल्या घरामध्ये काही विशेष बदल नोंदवला गेला. तो म्हणजे घरातील दोनपैकी एकाने झोपण्याची वेळ आणि काळ सेट करण्यासाठी व्हॉइस असिस्टंटचा वापर करत असल्याचे सांगितले. २५ ते३४ वर्षे वयोगटातील लोकांच्या तुलनेत ३५ ते ४५ वर्षे वयोगटातील लोक व्हॉइस असिस्टंटचा वापर जास्त करतात, असे या सर्वेक्षणातून समोर आले.

**तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त**

'अलेक्सा इंडिया'च्या 'कंट्री मॅनेजर' टीना सिदाना म्हणतात की, सध्या वेळेत झोपण्याप्रती आणि पुरेशी झोप घेण्याप्रती सजगता निर्माण होत आहे. स्मार्ट टेक्नोलॉजी, व्हॉइस असिस्टंट याचा लोकांना झोपेचा पॅटर्न ठरवण्यासाठी आणि पाळण्यासाठी महत्त्वपूर्ण उपयोग होत आहे. झोपण्यासाठी 'पर्सनलाइज्ड व्हॉइस एआय' हे हातातील स्क्रीन डिव्हाइस व्यावहारिक पर्याय म्हणून उदयास येत आहे.

या माध्यमातून वापरकर्ते झोपण्याचे अचूक गणित पाळू शकतात. हे उपकरण वापरकर्त्यांच्या विशिष्ट गरजा आणि आवडीनुसार कस्टमाइज्ड केले जाते.

**झोपण्यापूर्वी खाण्याची सवय**

विशेष म्हणजे सध्या जवळपास २१ टक्के लोक झोपण्यापूर्वी खाणे किंवा स्नॅक्स घेणे पसंत करताना दिसतात. ३४ टक्के लोकांना झोपण्यापूर्वी रिलॅक्सिंग पेय किंवा स्नॅक घेणे आवडते. प्रतिसादकर्त्यांनी दिवसभरात ब्रेन गेम्स खेळणे, कोडी सोडवणे, वाचन करून फोन टाळणे, म्युझिक, पॉडकास्ट आणि दैनंदिन बातम्यांच्या अपडेट्ससह आराम करणे या गोष्टींना दिनचर्येत समावेश करायला आवडत असल्याचे सांगितले तर ११ टक्के उत्तरदात्यांनी झोपण्यासाठी वेगळे काहीही करणार नसल्याचे स्पष्ट केले.

## 'माऊथ टॅपिंग' ट्रेंड धोकादायक



डॉ. कुंदन गायकवाड

आजकाल सोशल मीडियावर एक नवीन ट्रेंड सुरू आहे. तो म्हणजे माउथ टॅपिंग ट्रेंड. यामध्ये लोक तोंडावर टेप लावून झोपतात. यामुळे चांगली झोप येते आणि श्वसनाच्या समस्यांपासून आराम मिळतो, असा दावा केला जातो. तेव्हा त्यावर विश्वास ठेवत हा ट्रेंड आपल्या आरोग्यासाठी चांगला आहे की नाही याचा विचारही न करता अनेकांनी तो स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच माऊथ टॅपिंग ट्रेंड आरोग्यासाठी फायदेशीर आहे की हानिकारक, हे जाणून घ्यायला हवे.

यानुसार झोपण्यापूर्वी ओठांवर टेप लावला जात असल्यामुळे झोपल्यानंतर फक्त नाकातूनच श्वास घेता येतो. यालाच 'माउथ टॅपिंग' म्हणतात. असे केल्यामुळे घोरणे थांबत असल्याचा अनेकांचा दावा आहे. हा उपाय ऑक्सिजनचा पुरवठा आणि झोपेची गुणवत्ता सुधारत असल्याचेही काहींचे म्हणणे आहे. अर्थात काही लोकांना या ट्रेंडचा फायदा होऊ शकतो; परंतु डॉक्टर आणि आरोग्यतज्ज्ञ हे पूर्णपणे सुरक्षित मानत नाहीत.

**माउथ टॅपिंग ट्रेंडचे फायदे**

- टेप लावल्याने तोंड बंद राहते. त्यामुळे व्यक्तीला नाकाने श्वास घेणे भाग पडते आणि घोरण्याची समस्या कमी होते.
- तोंड उघडे राहत असल्याचे रात्री कोरडे पडते. जास्त तहान लागते. मात्र टेप लावून ही समस्या कमी करता येते.

किती धोकादायक आहे?

- एखाद्याला नाक बंद होण्याची समस्या असेल तर हा ट्रेंड त्यांच्यासाठी खूपच धोकादायक ठरु शकतो. असे केल्याने त्यांना अचानक ऑक्सिजनची कमतरता भासू शकते. त्यामुळे गुदमरणे किंवा श्वास घेण्यात अडचण येऊ शकते. त्वचेला इजा होऊ शकते. दररोज टेप लावल्याने ओठांची त्वचा खराब होऊ शकते. त्यामुळे ॲलर्जी, चिडचिड होणे किंवा सूज येण्याचा धोकाही नाकारता येत नाही.
- आपत्कालीन स्थितीत अचानक खोकला येणे, उलट्या झाल्याची भावना किंवा इतर कोणताही आरोग्यविषयक धोका उद्‌भवू शकतो. हा त्रास प्रसंगी जीवघेणाही ठरु शकतो. त्याचमुळेच श्वासोच्छ्वासाचा त्रास, नाक चोंदणे वा दमा असेल तर हा ट्रेंड तुमच्यासाठी अजिबात सुरक्षित नाही, हे लक्षात घ्या.



## रिकाम्या पोटी चहा, कॉफी पिताय?

डॉ. प्रसन्न नेने

बहुतेक लोक दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीने करतात. याशिवाय त्यांची सकाळ जणू अपूर्ण राहते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, हे घटक तुमच्या आरोग्यासाठी कसे आहेत? चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन असते. ते ताजेपणा आणि ऊर्जा देते. परंतु रिकाम्या पोटी हे घटक हानिकारक ठरु शकतात. यामुळे आरोग्याची गंभीर हानी होऊ शकते. अनेक प्रकारचे आजारही होऊ शकतात. म्हणूनच या धोक्यांची जाण असायला हवी.

**काय होते?**

- ॲसिडिटी आणि पचन समस्याः चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन आणि टॅनिनसारखे घटक असतात. ते पोटात ॲसिडची पातळी वाढवू शकतात. म्हणूनच रिकाम्या पोटी चहा किंवा कॉफी प्यायल्यास ॲसिडीटी, गॅस, ब्लोटिंग आणि अपचन यासारख्या समस्या उद्भवू शकतात.
- हाडांवर वाईट परिणामः कॅफिन शरीरातील कॅल्शियमच्या शोषणावर परिणाम करते. त्यामुळे हाडे कमकुवत होऊ शकतात. रिकाम्या पोटी जास्त वेळा चहा किंवा कॉफी प्यायल्यास हाडांचे दुखणे बळावते आणि ऑस्टिओपोरोसिसचा धोका वाढू शकतो.
- झोपेवर परिणामः सकाळी उठल्याबरोबर चहा किंवा कॉफी पिण्याचा थेट परिणाम मेंदूवर होतो. काही काळ तो सक्रिय वाटू शकता; परंतु हळूहळू झोपेची गुणवत्ता बिघडते आणि तणाव आणि चिंतादेखील वाढू शकते.
- निर्जलीकरणाची समस्याः कॅफिन हा लघवीचे प्रमाण वाढवणारा घटक आहे. याचा अर्थ कॅफिनमुळे शरीरातून अतिरिक्त द्रव बाहेर पडते. त्यामुळेच सकाळी रिकाम्या पोटी चहा किंवा कॉफी प्यायली तर शरीर डिहायड्रेट होते. यामुळे त्वचा आणि किडनीशी संबंधित समस्या वाढू शकतात.
- हार्मोनल असंतुलन आणि चयापचयवर परिणामः रिकाम्या पोटी चहा किंवा कॉफी प्यायल्याने कॉर्टिसोल हार्मोनची पातळी असामान्य होऊ शकते. त्यामुळे चयापचय आणि रक्तातील साखरेची पातळी प्रभावित होते. विशेषतः मधुमेह आणि थायरॉईडच्या रुग्णांसाठी ही बाब हानिकारक ठरु शकते.
- काय करावे? हे सगळे धोके टाळण्यासाठी चहा किंवा कॉफी पिण्यापूर्वी हलका नाश्ता करा. ब्लॅक टी किंवा ब्लॅक कॉफीऐवजी हर्बल किंवा ग्रीन टीचा अवलंब करा. कमी साखर आणि दुधात तयार केलेली चहा-कॉफी पिण्याची सवय लावा. सकाळी उठल्यावर एक ते दोन तासांनी हे पेये घ्या.

## नवजात बाळाला कशाची भीती वाटते?

डॉ.अजेय गर्जे

लहान पाहुणा येणार असल्याची बातमी मिळते तेव्हा घरात आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण दिसून येतं. तो छोटासा पाहुणा आला की घरात आनंद, उत्साह आणि नवचैतन्य येतं. प्रत्येक जण बाळाची कामं आणि कौतुक करण्यात व्यस्त होतो. बाळ एखाद्याच्या मांडीवर देतानाही काळजीपूर्वक हाताळण्याच्या सूचना केल्या जातात. त्याला सोडू नका आणि मोठा आवाज करू नका, असेही मोठ्यांकडून ऐकायला मिळते. मात्र त्यामागची कारणे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

नवजात बाळाला सर्वात जास्त दोन गोष्टींची भीती वाटते. पहिले म्हणजे मोठा आवाज आणि दुसरे म्हणजे पडण्याची भीती. म्हणूनच मूल लहान असताना लोक घरात मोठा आवाज करणे टाळतात आणि त्याला मांडीवर काळजीपूर्वक धरतात. मोठा आवाज लहान मुलांच्या मेंदूला थेट चालना देतो. त्याचमुळे मूल खूप घाबरते आणि लगेचच रडू लागते. याशिवाय नवजात मुलाला पालकांपासून वेगळे होण्याची भीती असते. म्हणूनच लहान असताना सुरक्षित आणि आरामदायक वाटण्यासाठी मुलं पालकांवर अवलंबून असतात.

- हालचालींची भीती

नवजात बाळाला अनोळखी लोकांची भीती वाटते. अनोळखी लोक त्यांच्यासाठी विचित्र आणि भयानक असू शकतात. काही मुलांना अंधाराची भीती वाटते. नवजात बाळांना अचानक होणाऱ्या हालचालींची भीती वाटू शकते कारण त्यांना त्यांना जगाची जाणीव नसते. नवजात मुलांना पालकांशिवाय इतर कोणीही सुरक्षित वाटत नाही. त्यांना असुरक्षिततेची भयंकर भीती वाटते.

- छोट्या आवाजाचीही भीती

घडणाऱ्या कोणत्याही छोट्या गोष्टींना ते घाबरू शकतात. लहान मुलांचे मन खूप नाजूक असते. यामुळे ती लहान आवाजानेही घाबरू लागतात किंवा एखाद्या अनोळखी व्यक्तीने उचलले तरीही ते घाबरतात. त्यामुळे लहान मुले सतत पालकांच्या जवळ राहण्याचा प्रयत्न करतात.



## पावडरचे दूध आरोग्याला हानीकारक

डॉ.अजिंक्य बोऱ्हाडे

मुलाला फॉर्म्युला दूध किंवा पावडर दूध देत असाल तर सावधान. कारण ते मुलाच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते. अलिकडेच या दुधाच्या तपासणीत शिसे आणि आर्सेनिक आढळून आले. त्यामुळे लहान मुलांच्या आरोग्याला गंभीर हानी पोहोचण्याची शक्यता असते. ग्राहक अहवालाच्या तपासणीत जवळजवळ सर्व फॉर्म्युला दुधाच्या नमुन्यांमध्ये पॉलीफ्लुरोआल्काइल (पीएफए) देखील आढळून आले तर बिस्फेनॉल ए (बीपीए) आणि ॲक्रिलामाइड अगदी एका नमुन्यात आढळले. त्यानंतर या दुधाच्या वापरासंबंधी प्रश्न उपस्थित झाले आहेत.



- 'अमेरिकन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स'च्या मते या दुधामुळे मुलांमध्ये अनेक गंभीर आजार होऊ शकतात. सहा महिने वय असणाऱ्या मुलांना फक्त आईचेच दूध पाजावे. ग्राहक अहवालाद्वारे तपासलेल्या ४१ पैकी ३४ फॉर्म्युला दुधाच्या नमुन्यांमध्ये शिसे आढळले. एनफामिलची सर्वोच्च पातळी न्यूट्रामिजेनमध्ये आढळते. चाचणी केलेल्या कोणत्याही नमुन्यांमध्ये शिशाची पातळी प्रमाणापेक्षा जास्त नसली तरी अगदी लहान प्रमाणातदेखील ती धोकादायक आहे. त्याचवेळी हे दूध बनवणाऱ्या कंपन्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी हे घटक आणि रसायने मिक्स केली नाहीत. ती वातावरणात आधीपासूनच असतात आणि तेथून ते पदार्थांमध्ये प्रवेश करतात.
- पावडर दुधाचे सेवन केल्यामुळे मुलांच्या मेंदू आणि मानसिक आरोग्याच्या वाढीमध्ये समस्या उद्‌भवू शकतात. वातविकार, डायरिया आणि बद्धकोष्ठता यासारख्या पचनाच्या समस्या वाढतात.
- या दुधामुळे मुलांच्या मूत्रपिंड आणि यकृतवर परिणाम होतो. ती वारंवार आजार पडतात. हाडे कमकुवत होणे आणि वाढ मंद होणे यासारखे धोकेही वाढू शकतात.

मुलांसाठी सुरक्षित पर्याय जागतिक आरोग्य संघटना आणि डॉक्टर जन्मानंतर पहिल्या सहा महिन्यांसाठी फक्त आईच्या दुधाची शिफारस करतात.

कारण ते सर्व आवश्यक पोषक तत्त्वांनी समृद्ध असते. मात्र मुलांना आईचे दूध शक्य नसल्यास सेंद्रिय आणि प्रमाणित फॉर्म्युला दूध देता येते. तथापि, त्यात हानिकारक रसायने नसल्याची खात्री करण्यासाठी लेबल काळजीपूर्वक वाचा. मूल एक वर्षाचे झाल्यावर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ताजे आणि शुद्ध दूध द्या.

### झोपेशी तडजोड नको

नवसंशोधन



अपुऱ्या झोपेच्या दुष्परिणामांबाबत बरंच सांगितलं आणि बोललं गेलं आहे. सहा तासांपेक्षा कमी झोप घेणं काहीजणांना महागात पडू शकतं. मधुमेही, उच्च रक्तदाबाचे रुग्ण, हृदयविकार तसंच पक्षाघाताच्या रुग्णांनी पुरेशी झोप घ्यायलाच हवी. अन्यथा, अशा रुग्णांना कॅन्सर होण्याची शक्यता असते, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. कमी झोपेमुळे तुम्ही इतर काही विकारांना बळी पडू शकता. त्यामुळे पुरेशी झोप घ्या. झोपेबाबत कोणतीही तडजोड करू नका.

### दुर्लक्ष पडेल महागात

दंतारोग्य



दातांकडे, तोंडाच्या आरोग्याकडे लक्ष देणं गरजेचं असतं, हे अनेकांच्या गावीही नसतं. मध्यंतरी केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब समोर आली आहे. भारतीय लोक तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे बरेच दंतविकार जडू शकतात. त्यातच मधुमेह आणि दंतविकार यांचा खूप जवळचा संबंध असतो. भारत ही मधुमेहाची राजधानी बनत चालल्यामुळे दातांकडे केलेलं दुर्लक्ष महागात पडू शकतं.

## दुसऱ्या सल्ल्याविषयी...



सर्वसाधारणपणे दुर्धर आजारांमध्ये दोन डॉक्टरांचा सल्ला घेतला जातो. एका डॉक्टरांशी सल्लामसलत केल्यानंतर दुसऱ्या डॉक्टरांचाही सल्ला घ्यावा असा विचार अनेकजण करतात. मात्र दुसऱ्या सल्ल्याची ही प्रक्रिया फक्त दुर्धर आजारांपुरती मर्यादित असते असं नाही तर काही लहानमोठे आजार आणि शस्त्रक्रियांसाठीही दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेता येतो. उपचार सुरू करण्याआधी किंवा शस्त्रक्रियेआधीच दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला म्हणजे सेकंड ओपिनियन गरजेचं असतं असं नाही तर औषधोपचारांच्या निर्णयातही हा सल्ला मोलाचा ठरू शकतो. कॅन्सर किंवा इतर दुर्धर आजारांमध्ये नेमकं काय होईल, रुग्ण वाचण्याची शक्यता किती असे अनेक प्रश्न रुग्ण आणि त्याच्या कुटुंबियांना पडलेले असतात. या प्रश्नांची योग्य उत्तरं मिळवण्यासाठी सेकंड ओपिनियन आवश्यक असतं.

सेकंड ओपिनियनमुळे मनातली चलबिचल कमी होते. आपण घेत असलेले उपचार योग्य असल्याची जाणीव झाल्याने काही प्रमाणात निश्चिंती लाभते. योग्य ते मार्गदर्शन मिळतं. शस्त्रक्रिया केल्यावर किंवा उपचार सुरू केल्यानंतर शरीरावर कोणते परिणाम होतील हे जाणून घेण्यासाठीही दुसऱ्या डॉक्टरांचा सल्ला घेता येईल. अर्थात प्रत्येक आजारासाठी दोन डॉक्टरांचा सल्ला घेण्याची गरज नसली तरी काही आजारांमध्ये हा दुसरा सल्ला मोलाचा किंवा दिशादर्शक ठरू शकतो. मात्र दुसरा सल्ला प्रत्येक वेळी बरोबरच असेल असंही नाही. दोन डॉक्टरांनी व्यक्त केलेला अंदाज वेगवेगळाही असू शकतो. अशा वेळी तिसऱ्या सल्ल्याची गरज पडू शकते. म्हणजेच आपल्या शंकांचं पूर्णपणे निरसन होत नाही तोपर्यंत डॉक्टरांचा सल्ला घेत रहाणं गरजेचं आहे. अर्थात इंटरनेटवर शोध घेऊन आपल्या डॉक्टरांवर तसंच त्यांच्या उपचारांवर शंका घेण्यात काहीच अर्थ नाही. आपले डॉक्टर योग्य उपचार करत असल्याची खात्री बाळगायला हवी. दुसऱ्या सल्ल्याची गरज आहे किंवा नाही हे प्रत्येकाने ठरवायचं असतं. आजाराशी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याने बरेच लाभ होऊ शकतात.

## केसांसाठी कांदा

कांद्याच्या विविध लाभांविषयी आपण जाणतो. कांद्यामुळे केसांना बळकटी मिळते शिवाय केसांची लवकर वाढही होते. केसांचं गळणं थांबवण्यासाठी कांद्याचं तेल वापरता येईल. कांद्याच्या तेलामुळे डोक्याचं रक्ताभिसरण चांगल्या पद्धतीने होतं. मुळांपर्यंत रक्त पोहोचल्याने केस वाढायला मदत होते. कांद्यात सल्फरचं प्रमाण जास्त असतं. यामुळे केसांच्या वाढीला चालना मिळते. यातली काही खनिजंही केसांच्या वाढीसाठी चांगली मानली जातात.



### नियमित तपासणी गरजेची

डोळ्यांचे आरोग्य



डोळ्यांची नियमित तपासणी गरजेची आहे कारण प्रत्येक नेत्रविकाराची लक्षणं दिसून येत नाहीत. त्यामुळे दोन ते तीन महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करून घ्यायला हवी. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ज्येष्ठांनी डोळ्यांची जास्त काळजी घेणं गरजेचं आहे. वय वाढू लागल्यावर नेत्रविकार डोकं वर काढू लागतात. त्यामुळे डोळ्यांच्या कोणत्याही तक्रारींकडे दुर्लक्ष होता कामा नये.

